## वक्फ विधेयकाविरुद्ध तामिळनाडू सरकारचा ठराव

■ **वृत्तसंस्था, चेन्नई, दि. २७ :**
तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनी गुरुवारी विधानसभेत वक्फ (दुरुस्ती) विधेयक २०२४ विरोधात ठराव मंजूर केला. त्यांनी केंद्र सरकारला ते मागे घेण्यास सांगितले आणि म्हटले की या विधेयकाचा अल्पसंख्याक मुस्लिमांवर वाईट परिणाम होईल.

स्टॅलिन म्हणाले, केंद्र सरकार अशा योजना आणत आहे ज्या राज्यांच्या हक्कांच्या, संस्कृतीच्या आणि परंपरेच्या विरोधात आहेत. भारतात वेगवेगळ्या संस्कृती, परंपरा आणि भाषा अस्तित्वात आहेत. हे वक्फ दुरुस्ती विधेयक मुस्लिमांचे हक्क नष्ट करत आहे. केंद्र सरकारने कधीही मुस्लिमांच्या कल्याणाचा आणि त्यांच्या हक्कांचा विचार केलेला नाही.


Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

* वर्ष ५० * अंक २७१ * | * अमरावती * | शुक्रवार, दिनांक २८ मार्च २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)


अग्राग्रलेख

## खरीखरी..

## बिर्ला - गांधी यांची गट्टी ?

राहुल गांधी यांनी लोकसभेचे सभापती जे लोकसभेचे अध्यक्षही असतात. त्यांच्यावर म्हणजेच ओम बिर्ला यांच्यावर काही आरोप केलेले आहेत. अध्यक्ष आपल्याला बोलूच देत नाहीत. असे राहुल गांधी यांनी अगदी ठामपणे सांगितले. अध्यक्षांनी सदस्यांना सांगितलेले आहे की, या सदनाची गरिमा कायम ठेवली पाहिजे. सदस्यांनी हे कधीच विसरू नये. तसेच विरोधी पक्ष नेते राहुल गांधींनी नियम 349 नुसार वागावे असे बिर्ला म्हणतात. ओम बिर्ला यांना एखाद्या सदस्याची वागणूक खटकली. तर त्यावर संबंधित सदस्याला तंबी देण्याचा अधिकार असतो. राहुल गांधी यांनी जर नियमांचे उल्लंघन केले असेल. तर त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. अध्यक्ष ओम बिर्ला यांनी राहुल गांधींवर केलेले आरोप गंभीर असले पाहिजेत. या आरोपांचे स्पष्टीकरण देण्यासाठी राहुल गांधी जेव्हा उभे राहिले. तेव्हा अध्यक्षांनी सभागृह तहकूब केले. ज्यांच्यावर आरोप केले. त्यांचे उत्तर ऐकण्याच्या आधीच अध्यक्षांनी सदन स्थगित केल्याचा राहुल गांधींचा आरोप आहे. राहुल गांधी म्हणतात. त्याप्रमाणे त्यांना अनेक विषयांवर बोलायचे होते. कुंभमेळ्याचे आयोजन चांगले झाले, हे सुद्धा आपल्याला सांगायचे होते. त्या सोबतच बेरोजगारीचा मुद्दाही तेवढाच महत्त्वाचा होता. पण अध्यक्षांनी सभागृह स्थगित केल्यामुळे आपल्याला बोलताच आले नाही. हे राहुल गांधी यांनी नमूद केलेले आहे. 2014 आणि 2019 या दोन लोकसभेच्या निवडणुकांनंतर लोकसभेत अपेक्षित संख्याबळ न आल्याने विरोधी पक्ष नेतेपदच अस्तित्वात नव्हते. पण यावेळी काँग्रेसने शंभर खासदारांचा आकडा जुळवल्याने नियमाप्रमाणे त्यांना विरोधी पक्षनेता पद देणे भाग होते. लोकशाहीत बहुमताचा नेता सदनाचाही नेता असतो. त्यामुळेच त्यांच्या महत्त्वाबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. सत्ताधारी पक्षाप्रमाणेच विरोधी पक्ष नेतेपद सुद्धा तेवढेच महत्त्वाचे असते. त्या पदाला कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा असतो. त्यामुळे लोकसभेचे कामकाज व्यवस्थितपणे चालवण्यासाठी सत्ताधारी पक्षाबरोबर विरोधी पक्षालाही स्थान असते. हे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनाही ठाऊक आहे. या पदाचा मान फार मोठा असतो. लोकसभेचे पहिले अध्यक्ष मावळंकर हे अनेकदा सत्ताधारी पक्षालाही झापत असत. त्यानंतरही आपल्या लोकसभेने अनेक दबंग अध्यक्ष पाहिलेले आहेत. सोमनाथ चॅटर्जी यांनी तर अध्यक्षपदावर विराजमान झाल्यानंतर आपल्या पक्षाची सदस्यताही सोडली होती. अशी अनेक उदाहरणे आहेत. 1971 नंतर अध्यक्ष पदापेक्षा पंतप्रधान पदावरील व्यक्तीला जास्त महत्त्व आल्याचे दिसते. 2014 सालामध्ये सुमित्राताई महाजन यांना अध्यक्षपदावर बसविण्यात आले होते. त्यांनी सत्तारूढ आणि विरोधी पक्षांबरोबर चांगला समन्वय साधला होता. 2019 सालापासून ओम बिर्ला यांच्याकडे हे पद आलेले आहे. जशी सदनाची गरिमा असते. तशीच त्या पदाचीही गरिमा असावी. हा बिर्लाजींचा मुद्दा कोण अमान्य करेल. परंतु या सर्व पदांची गरिमा कायम ठेवण्यासाठी दोन्ही बाजूंकडून तसे प्रयत्न झाले पाहिजेत. ओम बिर्ला यांनी आता अध्यक्षपदावर असताना तसा आदर्श घालून दिला पाहिजे. म्हणजेच विरोधी पक्षांनाही तक्रारी करण्याची गरज भासणार नाही. लोकशाहीचे हे मंदिर पवित्र रहावे. संसदीय भवन संविधान संमत राहावे. यासाठी अध्यक्षांना सर्वाधिकार आहेतच. ते त्यांनी वापरावे. पण कुणावरही अन्याय होणार नाही. हेही बघावे एवढीच अपेक्षा आहे. शेवटी एक गमतीशीर गोष्ट सांगावीशी वाटते. उद्योगपती घनश्यामदास बिर्ला आणि मोहनदास करमचंद गांधी यांची चांगलीच गट्टी म्हणजेच संवादपूर्ण मैत्री होती. तशीच गट्टी या बिलार्जींनी या गांधींसोबत ठेवावी. मात्र सध्या अशी गट्टी जमेल का. हा प्रश्न असला तरी, तशी अपेक्षा आपण का ठेवू नये.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# इमिग्रेशन व फॉरेनर्स बिल पास

### रोहिंग्या, बांगलादेशींनी अशांतता पसरवल्यास कठोर कारवाई : गृहमंत्री शहांचा इशारा

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २७ :**
इमिग्रेशन अँड फॉरेनर्स बिल २०२५ गुरुवारी लोकसभेत मंजूर करण्यात आले. विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले, रोहिंग्या असोत किंवा बांगलादेशी, जर ते भारताला हानी पोहोचवण्याच्या मानसिकतेसह आले तर त्यांच्यावर अतिशय कठोर कारवाई केली जाईल.

जर कोणी योगदान देण्यासाठी पुढे आले तर त्याचे स्वागत आहे. या धोरणासाठी उदारता आणि कडकपणा दोन्ही आवश्यक आहेत. भारतात येणाऱ्या सर्व परदेशी नागरिकांचे अपडेट्स ठेवली जातील. ते कोणत्या मार्गाने येत आहेत? कुठे थांबत आहेत? काय करत आहेत याबद्दलची माहिती अपडेट केली जाईल.

शहा पुढे म्हणाले, मोदीजींचे ध्येय २०४७ पर्यंत भारताला विकसित करणे आहे आणि हे लक्षात घेऊन, गेल्या १० वर्षांत या सभागृहात अनेक विधेयके आली आहेत. आम्ही प्रत्येक क्षेत्रातील प्रत्येक कायदा मजबूत करण्यासाठी काम केले आहे. आज मी हे विधेयक आणले आहे, ज्याद्वारे संशोधन क्षेत्रात संशोधन आणि विकास करणाऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था निर्माण करणाऱ्यांना एक उदार यंत्रणा मिळेल.



हे विधेयक ११ मार्च रोजी लोकसभेत सादर करण्यात आले. यावर सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील ३० खासदारांनी आपले विचार व्यक्त केले.

यावरील चर्चेला उत्तर देताना शहा म्हणाले की, पायाभूत सुविधांच्या क्षेत्रातही अनेक क्षेत्रात संशोधनाची तरतूद असेल. सध्या, चारही कायद्यांमधील अनेक व्यवस्था तुरळक आहेत.

हे एकच विधेयक चार कायदे रद्द करेल आणि त्यांचे एका कायद्यात रूपांतर करेल आणि २०४७ पर्यंत विकसित भारत बनवण्याच्या ध्येयाकडे वाटचाल करेल. यामध्ये एक मजबूत इमिग्रेशन धोरण खूप महत्वाचे आहे. यामुळे आपली प्रणाली सोपी होईल आणि अधिक विश्वासार्ह देखील होईल. तीन वर्षांच्या सखोल विचारानंतर ते डिझाइन केले आहे.

राजकीय कारणांसाठी याला विरोध करू नये. भारतात येणाऱ्या प्रवाशांचा डेटाबेस तयार केला जाईल, पर्यटन क्षेत्र देखील वाढेल. हे विधेयक जागतिक ब्रँडिंग वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल.

गुंतवणूक, रोजगार आणि जीडीपी या क्षेत्रात मोठे फायदे होतील. भारताचे नाव जगासमोर आणण्याच्या कामाचा वेग आणखी वाढेल.

सुरक्षेच्या दृष्टिकोनातून, आम्ही या विधेयकात ड्रग्ज कार्टेल, घुसखोरांचे कार्टेल आणि हवाला व्यापाऱ्यांना संपवण्यासाठी व्यवस्था करत आहोत. पासपोर्ट कायदा पासपोर्ट-व्हिसाची आवश्यकता मजबूत करेल आणि परदेशी नागरिकांची नोंदणी अधिक कडक करेल.

इमिग्रेशन कायदा २००२ मध्ये काही बदलांसह समावेश करण्यात आला आहे. १९२०, १९३० आणि १९४६ हे ब्रिटिश संसदेत बनवण्यात आले. आपल्या देशाचे हे एक महत्त्वाचे धोरण आहे जे सुरक्षा आणि विकास सुनिश्चित करते. यावर परदेशी खासदारांनी चर्चा केली.

आज ३० खासदारांनी आपले विचार मांडले आहेत आणि त्यापैकी एकही परदेशातील नाही. संसदही आपली आहे. ही अभिमानाची गोष्ट असल्याचा उल्लेख त्यांनी केला. हे अमृतकालातील भारताच्या हितासाठी तयार केले गेले आहे. डेटा व्यवस्थापन आणि प्रमाणीकरणाची गुंतागुंत दूर होते.

दरम्यान, आज गुरूवारी राज्यसभेत बँकिंग कायदे (सुधारणा) विधेयक, २०२४ आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले.

## गुढीपाडव्याला मोदी नागपुरात

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २७ :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ३० मार्चला नागपूर दौरा आहे. संघ मुख्यालय, दीक्षाभूमी, त्यानंतर माधव नेत्रालय आणि दारुगोळा निर्माण सोलार कंपनीला ते भेट देणार आहेत.

भाजपकडून प्रत्येक चौकात मोदींचे स्वागत केले जाणार आहे.

राष्ट्रीय स्वंयसेवक संघाशी निगडीत माधव नेत्रालयाच्या नव्या विस्तारित इस्पितळाचे भूमीपूजन पंतप्रधानांच्या हस्ते होऊ घातले आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणिराष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत एका व्यासपीठावर येणार आहेत. त्यामुळे या कार्यक्रमाला महत्व आहे. या कार्यक्रममाला मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, महसुलमंत्री तथा भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह ही उपस्थित राहणार आहेत.

नागपूर शहरात काही दिवसांपूर्वीच दंगल उसळली होती. या पार्श्वभूमिवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचा दौरा होत असून, पोलिसांचा तगडा बंदोबस्त ठेवला जाणार आहे.

### रायगडावरील वाघ्या कुत्र्याचे शिल्प हटवा

## सरकारला अल्टीमेटम

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :**

संभाजी ब्रिगेडने रायगडावरील वाघ्या कुत्र्याच्या शिल्पाच्या मुद्यावरून राज्य सरकारला निर्वाणीचा इशारा दिला आहे. सरकारने १ मेपर्यंत रायगडावरील वाघ्या कुत्र्याचा पुतळा हटवावा, अन्यथा संभाजी ब्रिगेड स्वतः पुढाकार घेऊन हे शिल्प हटवण्याची कारवाई करेल, असा अल्टिमेटम या संघटनेने दिला आहे.

माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी दोन दिवसांपूर्वी एका पत्रकार परिषदेद्वारे रायगडावरील वाघ्या कुत्र्याचे शिल्प हटवण्याची मागणी केली होती. त्यानंतर संभाजी भिडे यांनी त्यांच्या या मागणीला विरोध दर्शवला होता. संभाजीराजे भोसले जे म्हणाले ते १०० टक्के चूक आहे. वाघ्या कुत्र्याविषयी मी वाचले आहे. ती कथा सत्य आहे. वाघ्या कुत्र्याने चितेत उडी घेतली हेच सत्य आहे. त्यामुळे त्याचे स्मारक रायगडावर केले गेले, असे भिडे म्हणाले. त्यांच्या या भूमिकेनंतर संभाजी ब्रिगेड यांनी १ मेपर्यंत वाघ्या कुत्र्याचे शिल्प हटवण्याची मागणी केली आहे.

### १० वर्षे सश्रम कारावासाच्या शिक्षेचा कायदा करा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २७ :**
खासदार उदयनराजे भोसले यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन त्यांच्याकडे महत्त्वाची मागणी केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचा अवमान होईल, असे भाष्य करणाऱ्यांना दंड करण्यासाठी दहा वर्षे सश्रम कारावासाची अजामीनपात्र शिक्षा ठोठावणारा विशेष कायदा पारित करावा. अशी मागणी त्यांनी अमित शहा यांच्याकडे केली आहे. या संदर्भात आपल्या मागणीचे एक निवेदन देखील त्यांनी अमित शहा यांना दिले आहे.

## कोणत्याही बिळात लपला तरी...

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २७ :**
शिवसेना नेते तथा मंत्री शंभूराज देसाई यांनी कॉमेडियन कुणाल कामरा कोणत्याही बिळात लपला तरी त्याला प्रसाद देण्याचा इशारा दिला आहे.

स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या एका विडंबनात्मक गाण्याचे राज्याचे वातावरण तापले आहे. या प्रकरणी शिवसैनिकांनी कुणाल कामराच्या हॅबिटेट स्टुडिओची तोडफोड केली. दस्तुरखुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही कामराला माफी मागण्याचा अन्यथा कडक कारवाईला सामोरे जाण्याचा इशारा दिला.

या पार्श्वभूमीवर शंभूराज देसाई यांनी कुणाल कामराला उपरोक्त इशारा दिला आहे. कुणाल कामरा कोणत्याही बिळात लपला तरी आम्ही त्याला शोधून काढू. आम्हाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रोखले आहे. अन्यथा शिवसैनिकांना त्याला रस्त्यावर खेचून प्रसाद देण्यास वेळ लागणार नाही, असे शंभुराजे देसाई यांनी म्हटले आहे.

## प्यारे खान करणार नितेश राणेंची मोदींकडे तक्रार

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २७ :**

राज्याचे मंत्री नितेश राणे गेल्या काही महिन्यांपासून मुस्लीम समाजाबद्दल वादग्रस्त वक्तव्य करत आहेत. त्यांनी पुन्हा एकदा बुरख्याबद्दल वक्तव्य केले आहे. त्यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी म्हटले आहे.

नितेश राणे यांनी बेजबाबदार वक्तव्य करणे चुकीचे आहे. त्यांनी मुस्लीम समाजाबद्दल दृष्टीकोन बदलावे. त्यांच्या बेजबाबदार वक्तव्यामुळे महाराष्ट्र सरकारची प्रतिमा मलिन होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान मोदी हे सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास या तत्त्वावर काम करत आहेत. अशावेळी मंत्र्यांनी वादग्रस्त वक्तव्य करून सरकारची प्रतिमा मलिन करून नये, असे राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी म्हटले आहे.

माधव नेत्रालयाच्या नव्या विस्तारित इस्पितळाचे भूमीपूजन पंतप्रधानांच्या हस्ते होऊ घातले आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणिराष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत एका व्यासपीठावर येणार आहेत. दंगलीनंतर होत असलेला हा कार्यक्रम सुरक्षितपणेपार पाडावा म्हणून पोलीस यंत्रणा मेहनत घेत आहेत.

या पार्श्वभूमीवर नितेश राणे यांनी मुस्लीम समजाबद्दल पुन्हा वक्तव्य केले आहे. त्यानंतर प्यारेखान यांची प्रतिक्रिया आली आहे. त्यांनी नितेश राणे यांनी सबुरीचा आणि जबाबदारीने वागण्याचा, बोलण्याचा सल्ला दिला. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे नितेश राणे यांची तक्रार करणार असल्याचे सांगितले.

## ४० मुलांनी कापले १० रूपयांसाठी हात

■ **वृत्तसंस्था, अमरेली, दि. २७ :**

गुजरातमधील एका गावातील सरकारी शाळेत ४० मुलांनी शार्पनरने आपले हात कापले. हे सर्व विद्यार्थी पाचवी ते आठवी इयत्तेचे आहेत. त्याच शाळेतील ७ वीच्या एका विद्यार्थ्याने त्यांना एक टास्क दिला होता की ज्याच्या हातावर जास्त जखमा असतील त्याला १० रुपये बक्षीस दिले जाईल.

या विद्यार्थ्याला व्हिडिओ गेमब्लू व्हेल खेळून असे काम देण्याची कल्पना सुचली. गेल्या ८-१० दिवसांपासून मुले त्यांच्या हातावर चीरे काढत होती. एका मुलाच्या पालकांनी त्याच्या हातावर जखम पाहिली आणि त्याबद्दल तक्रार करण्यासाठी शाळेत गेले तेव्हा ही बाब उघडकीस आली.

हे प्रकरण अमरेली जिल्ह्यातील मोटा मुंजियासर गावातील प्राथमिक शाळेशी संबंधित आहे. सातवीच्या एका विद्यार्थ्याने वर्गातील इतर विद्यार्थ्यांना ब्लेडने हात कापण्याचे टास्क दिले होते.

इयत्ता ५ वी ते ८ वी पर्यंतची ४० मुले यात सामील झाली.

या टास्क दरम्यान विद्यार्थ्याने एक अट घातली होती की ज्याच्या हातावर जास्त जखमा असतील त्यानेच टास्क पूर्ण केला असे मानले जाईल. या प्रकरणी आता पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## वीज बिल न भरणाऱ्यांच्या दारात महावितरणच्या दामिनी




■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २७ :**
वीज बिल भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या बड्या ग्राहकांकडील विजेचे बिल वसुल करण्याची जबाबदारी महावितरणच्या दामिनीनी घेतली असून त्या कारवाईसाठी थेट ग्राहकांच्या दारात पोहचत आहेत.

चालू आर्थिक वर्षाचे केवळ ४ दिवस शिल्लक आहे आणि अजूनही परिमंडळातून १९० कोटी वसूल करण्यासाठी कारवाईला गती देण्यात आली असून प्रतिसाद न देणाऱ्या ८ हजार थकबाकीदार ग्राहकाचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे.

घरी कोणी नाही म्हणून महावितरणच्या वसुली पथकाला दाद न देणारे ग्राहक आणि दहा हजारापेक्षा जास्त रूपयाची थकबाकी असणारे ग्राहक दामिनीच्या रडारवर आहे. दामिनीकडून थेट वीज मीटर जप्तीची कारवाई करण्यात येत आहे. मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या मार्गदर्शनात आणि अधीक्षक अभियंते सुरेंद्र कटके (बुलडाणा), अजय शिंदे (वाशीम) आणि अजितपालसिंह दिनोरे यांच्या पुढाकाराने परिमंडळातील तीनही जिल्ह्यात दामिनी पथकाची निर्मिती करण्यात आली आहे. एका दामिनी पथकात अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंतासह १० महिला अभियंता, कर्मचारी सहभागी असून त्यांच्या मदतीसाठी सुरक्षा रक्षक आणि तंत्रज्ञाचा समावेश आहे.

बिलासंबधी तक्रार सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. परिमंडळाअंतर्गत घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक आणि इतर वर्गवारीतील वीज ग्राहकांकडून १९० कोटी थकबाकी वसूल करावयाची आहे, त्यामध्ये अकोला जिल्ह्यातून ५९ कोटी, बुलडाणा जिल्ह्यातून ९८ कोटी आणि वाशीम जिल्ह्यातून ३३ कोटी ६७ लाख वसूल होणे बाकी आहे.

**८५०० ग्राहकाचा वीज पुरवठा खंडित**

वीजबिल भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या परिमंडळातील ८ हजार ५०० ग्राहकाचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे. यामध्ये अकोला जिल्ह्यातील २ हजार ४९४, बुलडाणा जिल्हा ४ हजार २६२ आणि वाशीम जिल्ह्यातील १ हजार ७४४ ग्राहकाचा समावेश आहे.

संपूर्ण वीजबिलासह ३१० रुपये पुनर्जोडणी शुल्क भरल्याशिवाय या ग्राहकाचा वीज पुरवठा पुर्ववत करता येणार नाही. त्यामुळे महावितरणची कटू कारवाई टाळण्यासाठी चालू तसेच थकीत वीजबिल भरून सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

## हारतुरे नकोत, शालेय साहित्य आणा..

■ **महासागर प्रतिनिधी, गोंदिया, दि. २७ :**

माजी मंत्री राजकुमार बडोले यांचा आज २८ मार्च रोजी वाढदिवस असून, हा वाढदिवस वाचन दिवस म्हणून साजरा करण्याचे आवाहन केले आहे.

भेटायला येतांना बुके, हार ऐवजी पुस्तक किंवा शालेय साहित्य घेऊन आल्यास बरे. यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला वाचा, शिका आणि संघर्ष करा हा मूलमंत्र आपल्याला जपता येईल आणि गरजू विद्यार्थ्यांना मदत होईल असे आवाहन करणारी पोस्ट शेयर करण्यात आली आहे. दरम्यान, त्यांच्या या आवाहनाला मोठा प्रतिसादही मिळणर आहे.







# आदित्य ठाकरे यांना अटक होऊ शकते

## संजय निरुपम यांचा घणाघात

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ : शिवसेना नेते संजय निरुपम यांनी गुरुवारी दिशा सालियन प्रकरणात पुन्हा एकदा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. यावेळी त्यांनी आदित्य यांचा उल्लेख 'हत्यादित्य' असा करत अप्रत्यक्षपणे तेच दिशाच्या मृत्यूला कारणीभूत असल्याचा आरोप केला. तसेच यामागे ड्रग्ज रॅकेट असल्याचा संशयही त्यांनी व्यक्त केला.

संजय निरुपम येथे आयोजित पत्रकार परिषदेत म्हणाले की, राज्य सरकारची एसआयटी या प्रकरणाचा तपास करत आहे. दिशा सालियनच्या वडिलांनी उपस्थित केलेला प्रश्न अत्यंत गंभीर आहे. दिशावर सामूहिक अत्याचार करण्यात आला. तिच्या मृत्यूनंतर ३ दिवसांनी शवविच्छेदन करण्यात आले. दिशाचा मृतदेह जिथे सापडला, ती जागा इमारतीपासून जवळपास २५ फूट लांब आहे.



तिच्या शरीरावर कोणत्याही जखमा नव्हत्या. ती नग्नावस्थेत होती असा प्रत्यक्षदर्शींचा दावा आहे.

### आदित्य ठाकरेंनी सुप्रीम कोर्टाला खोटे सांगितले

या प्रकरणात खूप मोठे लोक सहभागी होते. पण त्यानंतरही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. या घटनेनंतर सुशांतसिंह राजपूतचा मृत्यू झाला. सुशांतचे प्रकरण वेगळे आहे. आदित्य ठाकरे यांनी या प्रकरणी सुप्रीम कोर्टाची दिशाभूल केली. त्यांनी एका अर्जाद्वारे कोर्टात माझी चौकशी झाली, सीबीआयने मला क्लीनचिट दिली असे सांगितले. पण दिशा सालियन प्रकरणाचा तपास सीबीआय करत नाही. हा तपास मुंबई पोलिसांकडे आहे. त्यामुळे त्यांनी कोर्टाला खोटी माहिती दिली.

संजय निरुपम यांनी यावेळी दिशाच्या मृत्यूमागे ड्रग्ज रॅकेट असल्याचाही संशय व्यक्त केला. ते म्हणाले, दिशाच्या मृत्यूमागे ड्रग्ज रॅकेट असण्याची शक्यता आहे. या प्रकरणी समीर खान नामक व्यक्तीला अटक झाली होती. त्याने चौकशीत आदित्य ठाकरे यांना ड्रग्जची सवय असल्याचे सांगितले आहे. ड्रग्ज पेडलरने दिलेला जबाब दिशाच्या मृत्यूमागे काय काय झाले? त्याचा आधार होता. मालवणी पोलिसांनी त्याची चौकशी करण्याची गरज होती. पण त्यांनी तो केला नाही. आता मालवणीतील तत्कालीन पोलिस अधिकाऱ्यांची चौकशी सुरू आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू झाल्यानंतर या प्रकरणी गुन्हा दाखल होईल. नंतर यासंबंधी आदित्य ठाकरे यांनाही अटक होऊ शकते. त्यानंतर आदित्य ठाकरे यांचे नाव हत्यादित्य होईल. दिशाच्या हत्येत त्यांचा समावेश होता हे ही सिद्ध होईल.

### आदित्य ठाकरेंनी आमदारकीचा राजीनामा द्यावा

संजय निरुपम यांनी यावेळी कुणाल कामराचा व्हिडिओ आणून ठाकरेंनी आपल्यावरील आरोपांपासून स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला. विधानसभेत आमचे आमदार जे बोलले रेकॉर्डवर आहे. बीडमध्ये सरपंचाची हत्या झाली. त्या हत्येतील आरोपी वेगळे होते. पण आरोपींशी संबंध असल्यामुळे विरोधकांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली. त्याच आधारावर आदित्य ठाकरे यांच्यावर एफआयआर दाखल झाला आणि त्यांचे हत्या प्रकरणात नाव आले तर त्यांनी नैतिकतेच्या आधारावर आपल्या आमदारकीचा राजीनामा दिला पाहिजे. या प्रकरणाची चौकशी होत नाही तोपर्यंत त्यांनी आपल्या पदापासून दूर राहिले पाहिजे, असे निरुपम म्हणाले.

# सौगातएमोदी की सौगातएसत्ता? उद्धव ठाकरेंचा भाजपवर हल्लाबोल

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ : भारतीय जनता पक्षाने (भाजप) देशभरातील ३२ लाख गरीब मुस्लिम कुटुंबांसाठी 'सौगात-ए-मोदी' उपक्रमांतर्गत ईद साजरी करण्यासाठी विशेष किट्स वाटप करण्याची घोषणा केली आहे. या उपक्रमावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी जोरदार टीका करत भाजपला खडा सवाल विचारला आहे. स्वतःला कट्टर हिंदुत्ववादी म्हणून मिरवणाऱ्या भाजपच्या या कृतीला सौगात-ए-सत्ता संबोधत ठाकरे यांनी या उपक्रमामागील राजकीय हेतूंवर बोट ठेवले आहे. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी भाजपच्या 'सौगात-ए-मोदी' उपक्रमाला ढोंगीपणाचा ठपका ठेवला. हा सौगात-ए-मोदी कार्यक्रम नाही, तर हे सौगात-ए सत्ता आहे. बिहार आणि उत्तर प्रदेशच्या निवडणुकीपर्यंतच हे असणार आहे की, यापुढेही हे चालणार आहे? असा थेट सवाल ठाकरे यांनी भाजपला विचारला. त्यांनी पुढे सांगितले की, ज्या भाजपने मुस्लिम मतदारांनी आम्हाला (शिवसेनेला) पाठिंबा दिल्यावर सत्ता जिहाद असा आरोप केला होता, तेच आता ईदच्या निमित्ताने ३२ लाख मुस्लिम कुटुंबांच्या घरी जाऊन सौगात वाटप करत आहेत. ही केवळ बेशरमपणाची कृती आहे, असे ठाकरे म्हणाले.

### भाजपने हिंदुत्व सोडले का?

उद्धव ठाकरे यांनी भाजपच्या हिंदुत्वाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. आम्हाला हिंदुत्व सोडले म्हणणारे उडाणटप्पू आता मोदींची सौगात कशी घेऊन जातात, हे पाहायचे आहे, असा टोला त्यांनी लगावला. तसेच, आता भाजपने हिंदुत्व सोडले आहे का? असा सवाल करत त्यांनी भाजपला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. ठाकरे यांनी पुढे सांगितले, जे लोक मला हिंदुत्व सोडल्याचा आरोप करतात, त्यांनी आधी आपल्या झेंड्यातील हिरवा रंग काढावा. आता हिंदू महिलांच्या मंगळसूत्रांचे रक्षण कोण करणार? खरे हिंदुत्ववादी पक्ष आता शिल्लक राहिले आहेत का? असे प्रश्न उपस्थित करत भाजपच्या हिंदुत्वाच्या दाव्यावर हल्ला चढवला.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी ३० मार्चला नागपूर दौऱ्यावर

## रेशीमबागेतील स्मृती मंदिराला भेट

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या ३० मार्च रोजी नागपूर दौऱ्यावर येणार असल्याची माहिती समोर आली आहे. या दौऱ्यादरम्यान ते रेशीमबाग येथील स्मृती मंदिराला भेट देणार आहेत. या भेटीमुळे नागपूर शहरातील राजकीय वातावरणात उत्साह संचारला असून, प्रशासनाने तयारीला वेग दिला आहे. पंतप्रधानांच्या या दौऱ्यामुळे भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) आमदारांचे नियोजित शिबिर रद्द करण्यात आले आहे, अशी माहिती पक्षाच्या सूत्रांनी दिली. पंतप्रधानांचा हा दौरा गुढीपाडव्यासारख्या सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या दिवशी होत असल्याने त्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. रेशीमबागेतील स्मृती मंदिर हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचे स्मारक असून, या भेटीतून भाजप आणि आरएसएस यांच्यातील वैचारिक बांधिलकी अधोरेखित होण्याची शक्यता आहे. सूत्रांनुसार, मोदी येथे संघ कार्यालयालाही भेट देण्याची शक्यता आहे, तसेच दीक्षाभूमीला अभिवादन करण्याचा त्यांचा मानस आहे. या दौऱ्यामुळे भाजपच्या आमदारांचे नियोजित शिबिर रद्द झाले असून, पक्षातील नेत्यांनी याला प्राधान्य दिले आहे. पंतप्रधानांचा दौरा हा पक्षासाठी आणि नागपूरसाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे शिबिर पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला, असे एका भाजप नेत्याने सांगितले. प्रशासनाने सुरक्षेच्या दृष्टीने कडक उपाययोजना सुरू केल्या असून, नागरिकांमध्येही उत्सुकता आहे. या भेटीतून विकास प्रकल्पांचे उद्घाटन किंवा घोषणा होण्याची शक्यताही वर्तवली जात आहे.

# एसटीकडून उन्हाळी गर्दीच्या हंगामात विशेष वाहतूक

**मुंबई :** उन्हाळ्याच्या सुट्टीच्या कालावधीत प्रवाशांची वाढणारी मागणी लक्षात घेता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) यंदाही जादा वाहतूक सेवेचे नियोजन केले आहे. दरवर्षीप्रमाणेच १५ एप्रिल २०२५ ते १५ जून २०२५ या कालावधीत लांब पल्ल्याच्या ७६४ अतिरिक्त फेऱ्या चालवण्यात येणार असून या सर्व फेऱ्यांचे आगाऊ आरक्षण सुरू करण्यात आले आहे.उन्हाळी सुट्टीदरम्यान अनेक प्रवासी आपल्या गावी जात असल्याने एसटीच्या लांब पल्ल्याच्या बसेसची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. या पार्श्वभूमीवर महामंडळाने स्थानिक शटल सेवा आणि जवळच्या फेऱ्यांव्यतिरिक्त अतिरिक्त लांब पल्ल्याच्या बससेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे, शालेय फेऱ्या रद्द करून त्या बसेस लांब पल्ल्याच्या मार्गांवर तैनात केल्या जाणार आहेत.

एसटीच्या मध्यवर्ती कार्यालयाने राज्यभरातील विविध मार्गांसाठी या जादा फेऱ्यांना मंजुरी दिली असून दररोज ५२१ बसेसच्या माध्यमातून सुमारे २.५०. लाख किलोमीटर अंतर कापले जाणार आहे. या विशेष बससेवा टप्प्याटप्प्याने सुरू केल्या जाणार असून१५ एप्रिलपासून प्रवाशांच्या सेवेत दाखल होतील. एसटी महामंडळाने प्रवाशांना उन्हाळी सुट्टीतील प्रवासाचे आगाऊ नियोजन करून या विशेष बससेवेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन ३० जूनपासून

**मुंबई:** गेले चार आठवडे सुरु असलेल्या राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे बुधवारी सूप वाजले. राज्य विधिमंडळाचे पुढील पावसाळी अधिवेशन ३० जून २०२५ पासून सुरु होईल, अशी घोषणा यावेळी दोन्ही सभागृहात करण्यात आली. विधानसभेत अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि विधान परिषदेत सभापती रॅम शिंदे यांनी अधिवेशन संस्थगित झाल्याचे जाहीर केले. ३मार्चपासून विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु झाले. या अधिवेशनात १० मार्च रोजी राज्याचा सन २०२५-२६च्या वर्षाचा अर्थसंकल्प मांडण्यात आला. अधिवेशनात एकूण १६ दिवस कामकाज चालले. लक्षवेधी सूचनांची विक्रमी संख्या हे या अधिवेशनाचे वैशिष्ट्य ठरले. याच अधिवेशनात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने नेते धनंजय मुंडे यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला.

# सौगात-ए-मोदीप्रकाश आंबेडकरांचा संतप्त सवाल : लहूने भिजलेली ही भेट मुस्लिम स्वीकारणार का?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ : वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपच्या 'सौगात-ए-मोदी' उपक्रमावर जोरदार टीका केली आहे. रमजानच्या पार्श्वभूमीवर भाजपने देशभरातील ३२ लाख गरीब मुस्लिम कुटुंबांना ईद साजरी करण्यासाठी विशेष किट्स वाटप करण्याची घोषणा केली आहे. मात्र, या उपक्रमाला लहूने भिजलेली सौगात संबोधत प्रकाश आंबेडकर यांनी मुस्लिम समाजाला या भेटवस्तू स्वीकारण्यापूर्वी विचार करण्याचा सल्ला दिला आहे.

### सौ चूहे खाकर बिल्ली हज को चली

प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या एक्स पोस्टमध्ये सौ चूहे खाकर बिल्ली हज को चली या म्हणीचा उल्लेख करत भाजपच्या या उपक्रमाला ढोंगीपणाचा ठपका ठेवला.

त्यांनी लिहिले, जो हाथ मुसलमानों के लहू से तर है गुजरात से लेकर मॉब लिंचिंग में मरने वाले हर मुसलमान तक आज वो हाथ चांद खजूर और सेवइयां दे कर मुसलमानों को बहलाना चाहते हैं. २००२ च्या गुजरात दंगलींपासून ते मॉब लिंचिंगच्या घटनांपर्यंत अनेक मुस्लिमांच्या मृत्यूसाठी भाजप आणि त्यांच्या विचारसरणीला जबाबदार धरत आंबेडकर यांनी या भेटवस्तूंच्या मागील हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मॉब लिंचिंग आणि गुजरात दंगलींची आठवण आंबेडकर यांनी आपल्या पोस्टमध्ये मॉब लिंचिंगच्या अनेक पीडितांची नावे नमूद केली, ज्यात तबरेज अंसारी, मोहम्मद अखलाक, जुनैद खान, अलीमुद्दीन अंसारी, पहलू खान, मोहसिन शेख, मोहम्मद कासिम, सिराज खान, झैनुल अंसारी आणि रकबर खान यांचा समावेश आहे.

त्यांनी प्रश्न विचारला, क्या मुसलमान तबरेज़ अंसारी, मोहम्मद अखलाक, जुनैद खान आणि अशा अनेक नावांना विसरले, जे या नफरतेचे बळी ठरले? तसेच, च्या गुजरात दंगलीतील बिलकिस बानो प्रकरणाचा उल्लेख करत त्यांनी मुस्लिम समाजाला विचारले, क्या के दंगों में बिलकिस बानो की चीखों को नज़रंदाज़ कर के मुसलमान सलवार-कमीज आणि कुर्ता-पायजामालेगा?


### वक्फ तरमीम विधेयक आणि बुलडोझर कारवाईवर टीका

आंबेडकर यांनी अलीकडील वक्फ तरमीम विधेयकाचा उल्लेख करत सांगितले की, या विधेयकाद्वारे मुस्लिमांच्या जमिनींवर निशाणा साधला जात आहे. तसेच, देशभरात बुलडोझर कारवाईद्वारे मुस्लिमांची ओळख पुसण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. मुल्क भर में बुलडोजर के जरिये मुसलमानों की पहचान को रोंदा जा रहा है. तमाम हालात के बावजूद, मुसलमान किस मुँह से सौगात-ए मोदी लेने को तैयार हो रहा है? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

# धारावीच्या सर्वेक्षणाने गेल्या सर्वेक्षणाचा रेकॉर्ड मोडला

## ६३ हजार गाळ्यांचे सर्वेक्षण पूर्ण

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ : धारावीच्या सर्वेक्षणाने गेल्या सर्वेक्षणाचा रेकॉर्ड मोडला, ६३हजार गाळ्यांचे सर्वेक्षण पूर्ण आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी असलेल्या धारावीच्या पुनर्विकास प्रकल्पाने नवा टप्पा गाठला आहे. सध्या सुरु असलेल्या व्यावसायिक आणि निवासी गाळ्यांच्या सर्वेक्षणाने गेल्या सर्वेक्षणाचा ( साल २००७-०८-) रेकॉर्ड मोडला आहे. सध्याच्या सर्वेक्षणात सुमारे ६३ हजाराहून अधिक गाळ्यांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. तळ मजल्यावरील भाडेकरुंसह गाळ्यांचे सर्वेक्षण झाले आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) च्या मार्गदर्शक



तत्त्वांनुसार केवळ तळ मजल्यावरील भाडेकरूंच्या गाळ्यांना मोफत घरांसाठी पात्र मानले जाते. आमच्या सर्वेक्षणाने एक महत्त्वाचा आणि निर्णायक टप्पा ओलांडला आहे. ही सरकारसाठी निश्चितच अभिमानाची गोष्ट आहे. हा पुनर्विकास प्रकल्प केवळ तळमजल्यावरील भाडेकरूंपुरता मर्यादित नसून, वरच्या मजल्यांवरील बांधकामांचाही यात समावेश होतो. त्यामुळे सरकार सर्वांसाठी घरे देण्यासाठी पुढाकार घेत आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे (डीआरपी) मुख्य कार्यकारी अधिकारी एस. व्ही. आर. श्रीनिवास यांनी म्हटले आहे.नव्या सर्वेक्षणात ४५हजारांहून अधिक गाळ्यांचे गल्लीबोळात जाऊन सर्वेक्षण झाले. यावेळी ८४ हजारांहून अधिक गाळ्यांना क्रमांक दिला आहे. तसेच ६३ हजारांहून अधिक गाळ्यांचे घरात जाऊन सर्वेक्षण केले झाले. गेल्या सर्वेक्षणाच्या तुलनेत सध्याच्या सर्वेक्षणात तळमजल्यावरील भाडेकरूंची घरे, वरच्या मजल्यांवरील बांधकामे, सध्याच्या अस्तित्वातील एसआरए इमारती, आरएलडीए जमिनीवरील झोपडपट्टीवासी नागरिक, तसेच सर्व धार्मिक स्थळांचा समावेश आहे. आता आम्ही सर्वेक्षणाच्या शेवटच्या टप्प्यात प्रवेश केला आहे. यातून स्पष्टपणे कळते की धारावीकर पुनर्विकासाच्या बाजूने असून ते सर्वेक्षणात सक्रियपणे सहभागी होत आहेत.आम्ही सर्व रहिवाशांना लवकरात लवकर सर्वेक्षणात सहभाग होण्याचे आवाहन करीत आहोत. त्यामुळे पुढील टप्पे सुरू करता येतील. ज्या रहिवाशांनी सर्वेक्षणात भाग घेतलेला नाही, त्यांनी लवकरात लवकर स्वेच्छेने या प्रक्रियेत सहभाग घ्यावा. ज्या भाडेकरूंनी किंवा रहिवाशांनी सर्वेक्षणात सहभाग घेण्यास नकार दिला आहे, किंवा वारंवार विनंती करूनही आवश्यक कागदपत्रे दिलेली नाहीत. त्या भाडेकरूंच्या घरांचे इथून पुढे सर्वेक्षण पुन्हा केले जाण्याची शक्यता कमी आहे असेही श्रीनिवास यांनी म्हटले आहे.

# हे प्रचंड बहुमत मिळवणारे अस्वस्थ सरकार उद्धव ठाकरे यांचा घणाघात

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी अर्थसंकल्पीय अधिवेशनावरून सरकारवर टीकेची झोड उठवली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकार हे प्रचंड बहुमत मिळवणारे एक अस्वस्थ सरकार आहे. या सरकारने अर्थसंकल्पीय अधिवेशनाद्वारे केवळ आपले अपयश व अस्वस्थता लपवण्याचा प्रयत्न केला, असे ते म्हणाले. उद्धव ठाकरे येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना म्हणाले की, काल संपलेले अर्थसंकल्पीय अधिवेशन हे सरकारचे अपयश व अस्वस्थता लपवणारे होते. सरकारने १०० दिवसांत सरकार काय करणार? असा संकल्प केला होता. पण सरकारला या संकल्पाचा विसर पडला. ते या १०० दिवसांतील एकाही आराखड्यावर बोलले नाही किंवा ठोस उपाययोजना करण्यात आली नाही. महायुतीचे सरकार आल्यानंतर बीडमध्ये सरपंच संतोष



देशमुख यांची निर्घृण हत्या झाली. परभणीत सोमनाथ सूर्यवंशी यांची हत्या झाली. स्वारगेट बलात्कार प्रकरण झाले. भ्रष्टाचाराची प्रकरणे दररोज पुढे येत आहेत.

### मुंबईतील रस्ते अन लाडकी बहिणी योजनेवरून निशाणा

मुंबईतील रस्ते घोटाळाही उजेडात आला आहे. संपूर्ण मुंबईत खोदकाम करण्यात आले आहे. यासंबंधी ॲडव्हान्स कुणाला व किती दिली याचे काहीच सोयरसुतक नाही. या प्रकरणी अध्यक्षांच्या दालनात बैठक झाली, पण त्यात पुढे काय करणार यावर कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आले नाही. भ्रष्टाचाराचा पैसा कुणाच्या खिशात गेला, कोणत्या कंत्राटदारांना कंत्राटे मिळाली यावर कोणतेही समाधानकारक उत्तर महाराष्ट्रातील जनतेला मिळाले नाही.

हे सरकार कर्जमाफी करणार होते, त्यावर वाच्यता नाही. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणार होते. त्यावरही एकही शब्द बोलण्यात आला नाही. उलट लाडक्या बहिणींची वर्गवारी केली जात आहे. त्यांची कागदपत्रे तपासली जाणार आहेत. म्हणजे तुम्ही मते घेताना तुम्ही जे काही करायचे ते सरळ केले. पण आता तुम्ही लाडक्या बहिणींच्या दस्तावेजांची पडताळणी करणार. यामुळे नको ती योजना असे म्हणण्याची वेळ आली आहे. उद्धव ठाकरे म्हणाले, बऱ्याच वर्षानंतर शांत असणाऱ्या नागपुरात दंगल झाली. मुख्यमंत्री या प्रकरणी सर्वांना सावरण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत. पण त्यांच्या (एकनाथ शिंदे) मनात अजूनही मुख्यमंत्रीपदाचे जे काही कोंब फुटले आहेत, नको तिथे, ते कोंब अजूनही जात नाहीत. ते त्यांना छळतात की काय? हा एक प्रश्न मुख्यमंत्र्यांना पडला असावा असे वाटते.

# मुंडेंना वाचवण्यासाठी काही लोकांना अभय:दमानिया



**मुंबई :** सुदर्शन घुलेने देशमुख हत्या प्रकरणी पोलिसांपुढे कबुली दिली असेल तर ग्राह्य धरली जात नाही, मॅजिस्ट्रेटपुढे दिली तर केस संपल्यात जमा आहे. पण त्याने नेमके कुणासमोर कबुली दिली हे आपल्याला अजून माहिती नाही, कलम १६४ खाली जर कबुली दिली असेल तर चांगलेच आहे, असे अंजली दमानिया यांनी म्हटले आहे. अंजली दमानिया पुढे बोलताना म्हणाल्या की, बालाजी तांदळे, शिवलिंग मोराळ, राजेश पाटील, प्रशांत महाजन हे पोलिस अधिकारी देखील आहेत. पण यांच कोणाचचे नाव आत्तापर्यंत चार्जशीटमध्ये आले नाही. या सर्वांना सहआरोपी करा. यांना सहआरोपी करत नाहीत कारण यांना धनंजय मुंडे छुपी मदत करत होते. ते अडकू नये म्हणून या लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला नाही.

**मुंडेंनी मदत केली** अंजली दमानिया म्हणाल्या की, संतोष देशमुख हत्येचा सूत्रधार वाल्मीक कराड होता असे चार्जशीटमध्ये येत नाही तो पर्यंत त्यांना फाशीची शिक्षा होणार नाही. आता हे सर्व चार्जशीटमध्ये येणं गरजेचे आहे. यात बालाजी तांदळे, शिवलिंग मोराळ, राजेश पाटील, प्रशांत महाजन हे पोलिस अधिकारी देखील आहेत. पण यांच कोणाचचे नाव आत्तापर्यंत चार्जशीटमध्ये आले नाही. या सर्वांना सहआरोपी करा. यांना सहआरोपी करत नाहीत कारण यांना धनंजय मुंडे छुपी मदत करत होते. ते अडकू नये म्हणून या लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला नाही.

अंजली दमानिया म्हणाल्या की, संदीप क्षीरसागर, बजरंग सोनवणे हे या प्रकरणाबद्दल कुठे काही बोलताना दिसून येणार नाही. एक एक प्रकरण बाहेर येत असताना प्रत्येक जण बॅकफुटवर जाताना दिसून येत आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोप करणारे बीडमधील राजकीय नेते बॅकफुटवर येताना दिसून येत आहे. त्यांना वाटत आहे की आपण जर काही बोललो तर आपल्याही गोष्टी बाहेर येतील, आपल्यावरही काही शेकू शकेल. सुदर्शन घुले हा टोळीप्रमुख नसून वाल्मीक कराडच टोळीप्रमुख असल्याचे दमानिया म्हणाल्या.

# 'वाघ्या'च्या समाधीवरील भावना समजून घ्या

**मुंबई :** मराठ्यांनी अटकेपार झेंडे लावल्याचे आपण खूप गर्वाने सांगतो. पण ज्या होळकरांनी प्रत्यक्षात अटकेपार झेंडे रोवले, त्यांच्या समाधीची आज काय अवस्था झाली आहे? असा सवाल भूषणसिंह होळकर यांनी उपस्थित केला आहे. वाघ्या कुत्र्याच्या समाधीबद्दल सरकारने दोन्हीकडील भावना समजून घेतल्या पाहिजेत. या प्रकरणी कुणाच्या भावनेचा अनादर खपवून घेणार नाही, असेही भूषणसिंह होळकर यांनी या प्रकरणी ठणकावून सांगितले आहे.

दरम्यान भूषणसिंह होळकर पुढे बोलताना म्हणाले की, होळकरांनी रायगडावरच्या समाधीसाठी देणगी दिली होती, त्यामुळे आमचा समाजाच्या भावना त्या समाधीशी जोडली गेली आहे, कोणाच्या भावनेचा अनादर खपवून घेणार नाही. या प्रकरणावर जी लोकं बोलत आहेत त्यांनी कुणाच्या भावना दुखावणार नाही, अशी भूमिका घेतली पाहिजे. राज्यातील सामाजिक सलोखा यामुळे खराब होणार नाही याची काळजी बोलताना घेतली पाहिजे, असे होळकरांनी म्हटले आहे.

### नेमके होळकरांचे वक्तव्य काय?

भूषणसिंह होळकर पुढे बोलताना म्हणाले की, वाघ्या कुत्र्याच्या समाधीबाबत दोन्ही कडील बाजू समजून घेतल्या पाहिजे. मग सरकार जी भूमिका घेईल त्या भूमिकेबद्दल सर्व महाराष्ट्राने राहिले पाहिजे, असे मला वाटते. यात होळकरांचा रोल येतो कुठे तर रायगडावरील शिवसमाधीसाठी होळकरांनी देणगी दिली. तेव्हापासून होळकरांचा यामध्ये सहभाग दिसून येतो. तर वाघ्या कुत्र्याचे प्रकरण हे शिवकालीन आहे, ह्या दोन गोष्टीच्या कालखंडाचा आपण विचार केला पाहिजे.

तेव्हा होळकरांचा संबंध आला भूषणसिंह होळकर म्हणाले की, शिवसमाधी उभारण्यासाठी निधीची कमतरता पडत असताना काही मंडळी शिवस्मारकाच्या संवर्धनासाठी काम करत होती.



# एकनाथ शिंदेंना उद्धव ठाकरेंनीच ऊर्जा दिली:संजय राऊत

**मुंबई :** एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर टीका करताना आत्मपरीक्षण केले पाहिजे. ज्या दिवशी मोदी-शहांचे छत्र उडालेले असेल तेव्हा तुम्ही कुठे असाल हा विचार शिंदे गटाने करणे गरजेचे आहे, असे ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे. संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, एकनाथ शिंदे यांना सर्वांत जास्त ऊर्जा उद्धव ठाकरे यांनीच दिली आहे, अशी ऊर्जा त्यांना देऊ नका हा माणूस घात करेल असे सांगणारी लोकं आज त्यांच्याच आवती भोवती ठाण्यात आहे. आताचे ठाण्यातील खासदार-आमदारआहेत त्यांनीच उद्धव ठाकरेंना म्हटले होते की साहेब हा माणूस तुम्हाला धोका देईल, यांची नियत चांगली नाही. आम्ही त्याला साक्षीदार आहोत.

**...तर शिंदेंना दारात उभे केले नसते**-संजय राऊत म्हणाले की, एकनाथ शिंदे यांनी टीका सहन केली पाहिजे. राज्यकर्त्याने जर टीका केली तर तो अधिक पुढे जातील. ज्याने आपल्यावर सुरूवातीपासून मेहरबानी केली आहे त्या व्यक्तीवर टीका करताना जरा जपून बोलले पाहिजे. छगन भुजबळ, गणेश नाईक यांनी पक्ष सोडल्यानंतर टीका केली नाही. ठाकरेंनी दिले आहे म्हणून मोदी-शहा फडणवीसांकडे तुमची किंमत आहे, नाहीतर त्यांनी दारात उभे केले नसते. मला त्यांची नियत माहिती आहे. तुमच्यात शिवसेना फोडण्याची नियत होती म्हणून तुम्हाला जवळ केले.

**राज्याचे गृहमंत्री हाताश**-संजय राऊत म्हणाले की, संतोष देशमुख प्रकरणात आरोपींच्या आकाला वाचवण्याचे काम काही काळ गृहमंत्री करत होते. आता जसे साताऱ्याच्या एका आकाला वाचत आहे. महाराष्ट्रात कायदा सुव्यवस्था राहिलेली नाही. गृहमंत्री हे हाताश असल्याने हे सर्व सुरू आहे.

# बँक ऑफ महाराष्ट्र सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांकडून ३१ लाख रुपयांचे वाटप

## सामाजिक कार्यासाठी ७४ संस्थांना मदत

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २५ : समाजकार्यात सेवानिवृत्त बँक कर्मचारी, अधिकारी किती सक्षम असू शकतात ज्यांच्या आर्थिक मदतीमुळे व सामाजिक कार्यातून समाजाला दिशा व प्रेरणा मिळते हे बँक ऑफ महाराष्ट्र निवृत्त कर्मचारी संघटनेने गेल्या पंचवीस वर्षात भरीव कामगिरी करून दाखविले आहे असे प्रतिपादन गडचिरोली येथील सामाजिक कार्यकर्ते व आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्थेचे संस्थापक डॉ सतीश गोगुलवार यांनी केले. भारतीय मजदूर संघाशी संलग्न असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र रिटायर्ड एम्प्लॉइज वेल्फेअर ऑर्गनायझेशन द्वारा आयोजित नवी पेठ येथील निवारा सभागृहात सामाजिक कृतज्ञता निधी समर्पण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ गोगुलवार बोलत होते.डॉ गोगुलवार यांनी पुढे सांगितले आदिवासी बांधवांशी संवाद सुरू केल्यानंतर तेथील लोकांच्या प्रश्नाचा अभ्यास केला.आरोग्य,रोजगार याचबरोबर सेंद्रिय शेती कडे देखील लक्ष देण्याची गरज आहे तेथील हवामानातील बदल ही लक्षात घेतला पाहिजे.त्याप्रमाणे तेथे कार्य केले पाहिजे. या वेळी शुभदा देशमुख यांनी गडचिरोली येथील महिलांसाठी बचतगट द्वारे चालणाऱ्या विविध उपक्रमाची तसेच महिला सक्षमीकरणासाठी करत असलेल्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक बाळासाहेब




फडणवीस होते.नारायण अचलेरकर,मोहन घोळवे,भास्कर माणकेश्वर,संतोष गदादे, डॉ सुनील देशपांडे,शुभदा देशमुख,अर्चना सोहनी, डॉ संजय बारगजे यांची यावेळी मुख्य उपस्थिती होती. दरवर्षी समाजात काम करणाऱ्या विविध संस्थांच्या प्रकल्पाची व कार्याची पाहणी केली जाते.समाजातील उपेक्षित,दिव्यांग,गतिमंद, एड्सग्रस्त, तसेच अनेक वैद्यकीय सेवा,पर्यावरण, कृषी,शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक संस्थांना संघटनेच्या सदस्यांनी स्वतःचे पैसे टाकून आत्तापर्यंत तीन कोटी रुपयांपर्यंत मदत केली असल्याचे बँक ऑफ महाराष्ट्र निवृत्त कर्मचारी संघटनेचे महासचिव नारायण अचलेरकर यांनी यावेळी सांगितले.भविष्यातही असे समाजकार्य चालूच राहील अशी ग्वाही या वेळी दिली.यावेळी स्मरणिकेचे प्रकाशनही पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.आदर्श गो सेवा,महामानव बाबा आमटे बहुउद्देशीय संस्था,स्वामी विवेकानंद जीवनज्योती संस्था,नर्मदा लय,अल्प परिवार,आरोग्य भारती,भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान,चैतन्य ज्ञानपीठ,आस्था फाउंडेशन,प्रीतम फाउंडेशन,शिवसमर्थ संस्था,सिद्धार्थ सामाजिक विकास संस्था यासह एकूण ७४ संस्थांना यावर्षी निधी वितरित करण्यात आला.

वोकाट्राइब प्रायव्हेट लिमिटेड कंपनी अमरावती ला हॉस्पिटलमध्ये कामासाठी मेगा भरती सुरू आहे
वार्ड बॉय -150 , जीएनएम नर्सिंग -100 , हाऊस कीपिंग-90 ही पदे भरती सुरू आहे.
संपर्क 07620610131 09623316598 08305146500
8 तास ड्युटी राहील
पगार 10,000-15000
संपर्काची वेळ
सकाळी 10 ते संध्याकाळी 5 पर्यंत.

## रोजगार मेळाव्यात 168 उमेदवारांची निवड

**अमरावती** - शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय येथे आज जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'पंडित दीनदयाल उपाध्याय महिला रोजगार मेळावा' आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यामध्ये 280 जागेसाठी ऑनलाइन आणि ऑफलाईन असे एकूण 470 महिला उमेदवारांनी नोंदणी केली.

# अंबुजा काँक्रीट नॉर्थ प्रा.ली.च्या सिमेंट कारखान्याला तीव्र विरोध

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या जनसूनावणी दरम्यान नागरिक झाले आक्रमक

### स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्याची केली मागणी

### आवळा दाखवून कोवळ काढण्याचा कंपनीचा केविलवाणा प्रयत्न





**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर रेल्वे( दि.27 )** - तालुक्यातील मौजा मालखेड येथे 6 एमएमटीपीए (2म3 एमएमटीपीए) च्या सिमेंट उत्पादन क्षमतेसह स्टँड अलोन ग्राइंडिंग युनिट प्रस्तावित ग्रीनफिल्ड प्रकल्पाला पर्यावरणीय अनुमती मिळण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ उप प्रादेशिक कार्यालय अमरावती -1 यांनी जनसूनावणी आयोजित केली होती. या जनसूनावणीला अमरावती चे निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, चांदुर रेल्वे येथील तहसीलदार पूजा माटोडे यांच्यासह महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी उपस्थित होते. या परिसरात असणारे चांदुर रेल्वे तालुक्यातील मालखेड, धानोरा, दहिगाव, लालखेड, काठेवाडी हेटी, अमरावती तालुक्यातील उदखेड, कस्तुरा, मोगरा, पार्डी, वडगाव जिरे, नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील म्हसाळा, एरंडगाव या गावामधील नागरिकांना या जनसुनावणीला बोलविले असल्याचे सांगितले. परंतु प्रत्यक्षात मात्र मोजक्याच गावातील नागरिकांची उपस्थिती होती. यापैकी उपस्थित गावकऱ्यांनी या सिमेंट कारखान्यापासून होणारे वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, जल प्रदूषण, मृदा प्रदूषण यासंदर्भात प्रश्न उपस्थित केले, तर सिमेंट कारखान्यालगत असणाऱ्या शेतीची उत्पादन क्षमता घटून शेतकरी हवालदिल होतील असे देखील सांगितले, शिवाय या कारखान्यास लागणारे प्रचंड पाणी कुठून आणणार या प्रश्नावर कंपनी च्या अधिकारी यांनी नियमानुसार व कंपनीच्या कायद्यानुसार व्यवस्था केली जाईल, असे थातूर-मातुर उत्तर दिले.

### सीएसआर फंडामधून होणार गावाचा विकास

आधीच पाण्याच्या टंचाई चा सामना करणारे ही गावे या कंपनी ला लागणारे पाणी कोणत्या गावाच्या वाट्याचे घेणार हा मोठा प्रश्न याठिकाणी उपस्थित केला गेला. परंतु उपस्थित कंपनी च्या अधिकाऱ्यांनी केवळ टोलवाटोलवी चे उत्तरे देत वेळ मारून नेली. उपस्थित नागरिकांना केवळ कंपनीच्या सीएसआर फंड मधून गाव विकास कसा होईल, याबाबत आश्वासित केले.

### प्रसारमाध्यमांना ठेवले दूर

अदानी च्या कारखान्याला रोखू शकणार नाही शिवाय कारखान्यात परप्रांतीयांची भरती करून स्थानिकांचे रोजगार हिरावले जातील अशी देखील भीती व्यक्त केली, निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सर्वांचे प्रश्न प्रोसेडींग ला लिहिण्याच्या सूचना केल्या आहेत. पर्यायाने कंपनी पुढे काय निर्णय घेईल याकडे सर्वांचे लक्ष लागले असून इतक्या मोठ्या जनसुनावणी कार्यक्रमाला मीडिया ला आमंत्रित केले नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष यावेळी पाहावायास मिळाला.

कंपनी अद्यावत मशनरीचा उपयोग करत असल्याने प्रदूषण होणार नाही असे देखील कंपनी च्या अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले. त्यामुळे काही नागरिकांना यावर समिश्र प्रतिसाद देत यावेळी स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी केली, तर या कारखान्याचे स्वागत केले. तर काहींनी आपण कितीही विरोध केला.

# रेल्वे स्थानकावर पाणी घेणे ठरले जीवघेणे

## रेल्वेखाली आल्याने प्रवाशाचा दुर्दैवी मृत्यू



**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे, ( दि. 27 )** - रेल्वे प्रवासादरम्यान पिण्याच्या पाण्यासाठी उतरलेला प्रवासी पुन्हा गाडीत चढताना तोल जाऊन खाली पडला आणि त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी (ता. 27) सकाळी 11 वाजताच्या सुमारास धामणगाव रेल्वे स्थानकावर घडली.

भूपेंद्र मधुकर शहारे (38, रा. दवडीपार बाजार, भंडारा) हे अहमदाबाद येथून नवजीवन एक्सप्रेसने परतत होते. त्यांच्यासोबत त्यांचा भाचा देखील होता. प्रवासादरम्यान पिण्याच्या पाण्यासाठी ते धामणगाव रेल्वे स्थानकावर उतरले. पाणी घेत असतानाच गाडी सुटली. त्यांनी धावत्या गाडीत चढण्याचा प्रयत्न केला, मात्र तोल गेल्याने ते थेट गाडीखाली पडले. या घटनेत त्यांचे दोन्ही पाय गाडीखाली आल्याने गंभीर जखमी झाले.

### पाच तास मृतदेहाची विटंबना ?

या घटनेनंतर मृतदेह तब्बल पाच तास प्लॅटफॉर्मवरच पडून होता. दवडीपार येथील सरपंच राजकीरण मेश्राम यांनी या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. आम्ही भंडारा जिल्ह्यातून निघालो, पण घटनास्थळी पोहोचायला सायंकाळचे 5 वाजले. त्यावेळी मृतदेह अजूनही प्लॅटफॉर्मवरच पडलेला होता. रेल्वे प्रशासनाने किमान तो शवविच्छेदनगृहात पाठवायला पाहिजे होता, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

### रुग्णवाहिकेत नेत असतानाच मृत्यू

या घटनेची माहिती मिळताच स्थानकावरील प्रवाशांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली. जखमी अवस्थेत असलेल्या शहारे यांना रुग्णवाहिकेतून रुग्णालयाकडे नेत असतानाच त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती बडनेरा रेल्वे पोलिसांना देण्यात आली.

### रेल्वे प्रशासनाचा ढिसाळ कारभार

या घटनेने रेल्वे प्रशासनाच्या दुर्लक्षाचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे. प्रवाशांची सुरक्षा आणि आपत्कालीन परिस्थितीतील तत्काळ मदतीसाठी रेल्वे प्रशासनाकडून अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची गरज असल्याचे नागरिकांनी सांगितले.

### रेल्वे स्टेशन धामणगाव, पण पोलिस स्टेशन बडनेरा

धामणगाव रेल्वे स्थानकावर घटना घडली असली, तरी ही जागा बडनेरा रेल्वे पोलिसांच्या कार्यक्षेत्रात येते. त्यामुळे कोणतीही दुर्घटना घडली की बडनेरा येथील पोलीस येईपर्यंत कारवाई होत नाही. या विलंबामुळे अनेकदा अपघातग्रस्तांना तातडीने मदत मिळत नाही आणि मृतदेह तासनतास पडून राहण्याच्या घटनाही घडतात.

# यास्मिननगरात वृद्धेची हत्या

**अमरावती** - भांडणात मध्यस्थी करण्यास गेलेल्या एका वृद्धेची काठीने हल्ला चढवून हत्या करण्यात आली. अख्तर बी शेख नुरूल्ला (60, रा. यास्मिननगर) असे मृतक महिलेचे नाव आहे. ही घटना 27 मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास नागपुरी गेट ठाण्याच्या हद्दीतील टॉवर लाइन परिसरातील यास्मिननगर येथे घडली. सदर घटनेनंतर नागरिकांनी मारेकऱ्याला चांगलाच चोप दिला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी शेख अख्तर शेख अय्युब (24, रा. यास्मिननगर) याच्याविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला. नागरिकांनी आरोपीला चोप दिल्यामुळे तो जखमी झाला आहे. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. शेख अख्तर व अख्तर बी शेख नुरूल्ला हे शेजारी राहतात. सायंकाळच्या सुमारास शेख अख्तरने त्याची आई सुरैय्या परवीन यांना ईदनिमित्त कपडे घेण्यासाठी पैसे मागितले. त्यावर तू कुठलाही कामधंदा करत नाहीस, मी तुला कुठून पैसे देऊ, तुझे वडील आल्यानंतर त्यांना पैसे माग, असे त्या शेख अख्तरला म्हणाल्या. त्यामुळे शेख अख्तरने आई सुरैय्या यांना काठीने मारहाण करणे सुरू केली. त्याचवेळी अख्तरच्या शेजारी राहणाऱ्या अख्तर बी शेख नुरूल्ला या रोजा सोडण्याचे साहित्य आणण्यासाठी घराबाहेर पडल्या. त्यावेळी त्यांना शेख अख्तर हा त्याची आई सुरैय्या परवीन यांना मारहाण करताना दिसला. त्यामुळे त्यांनी त्याला हटकले. त्यांना मारू नकोस, अशी मध्यस्थीची भूमिका घेतली. मात्र, कुणाचेही ऐकण्याच्या मनस्थितीत नसलेल्या शेख अख्तरने अख्तर बी शेख नुरूल्ला यांच्या डोक्यावर काठीने जोरदार प्रहार केला.

# पैशांची मागणी करून तरुणावर चाकूने हल्ला

### नेमानी गोडाऊन पुलाजवळील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 27 )** - पैशांची मागणी करून एका तरुणावर चाकूने हल्ला करण्यात आला आणि त्याची दुचाकी घेऊन आरोपींनी पलायन केले. सात ते आठ जणांनी हा हल्ला केल्याची माहिती पुढे आली आहे. यश संतोष ठाकूर (23, रा. कालीमाता मंदिर, बडनेरा) असे जखमीचे नाव आहे. त्याला बुधवारी रात्री उशिरा जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचाराकरिता दाखल करण्यात आले होते. यश संतोष ठाकूर हा अमरावतीवरून बडनेराकडे दुचाकीने जात असताना नेमाणी गोडाऊन जवळील पुलाजवळ त्यांना तीन ते चार युवकांनी अडविले. त्यांनी यश ठाकुरवर चाकूने पाच ते सात सपासप वार केले. त्यामुळे ते जखमी झाले. दरम्यान आरोपी हे घटनास्थळावरून फरार झाले. या घटनेनंतर जखमी यशला काही लोकांच्या मदतीने औषध उपचार करण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु प्रकृती गंभीर असल्यामुळे जखमी यशला एक्झॉन हॉस्पिटलमध्ये पुढील औषध उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्याची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. या घटनेच्या माहितीवरून बडनेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार कर्मचारीसह जिल्हा सामान्य रुग्णालयात पोहोचले होते. पोलिसांनी चौकशी केल्यानंतर आरोपींचे शोध कार्य सुरु केले होते. डीबीचे पथकही आरोपींच्या शोधात रवाना करण्यात आले आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, यश ठाकूर हुंडाई शोरूममध्ये नोकरी करत आहे व तो अमरावतीवरून घरी जाण्यासाठी बडनेराकडे जात होता. दरम्यान आरोपींनी लुटमारीच्या उद्देशाने यश ठाकुरवर हल्ला केला. त्याच्याजवळील किती पैसे आरोपी हे घेऊन फरार झाले आहे, याची माहिती कळू शकली नाही. हा प्राणघातक हल्ला होता की, जबरी चोरीच्या उद्देशाने हा हल्ला करण्यात आला, की, त्याच्यासोबत आरोपींचे कोणता जुना वाद होता, ही माहिती चौकशीनंतर पुढे येईल, अशी माहिती बडनेरा पोलिसांनी दिली. पुढील तपास बडनेरा पोलीस करत आहे.

### दुचाकीही नेली पळवून

नेमाने गोडाऊन पुलाजवळ सात ते आठ युवकांनी यशला अडवून पैशाची मागणी केली. त्यावेळी त्याने पैसे देण्यास नकार दिला. त्यामुळे पैसे दे नाहीतर तुझी दुचाकी घेऊन जातो, असे म्हणून आरोपींनी यशवर चाकूने हल्ला केला आणि त्याची दुचाकी घेऊन पळ काढला. अशी माहिती त्याच्यासोबत असलेल्या युवकांनी दिली आहे.

# शिक्षक बँक संचालक मंडळावर तातडीने कार्यवाही करा

## बँक विकास आघाडीचे सहनिबंधकांपुढे बेमुदत उपोषण आंदोलन



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 27 )** दि. अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेतील हुकूमशाही आणि बेकायदेशीर कारभाराच्या तक्रारीचा डोंगर सातत्याने वाढतच चालला असून याकडे विभागीय सहनिबंधकांनी नियंत्रक म्हणून सातत्याने कानाडोळा केला आहे. त्यामुळे शिक्षक बँक विकास आघाडीने विभागीय सहनिबंधक कार्यालयासमोर विविध मागण्यांसाठी 11 मार्च 2025 रोजी धरणे आंदोलन केले होते. परंतु त्यानंतर ही विभागीय सहनिबंधकांनी शिक्षक बँकेसंदर्भातील कोणत्याही तक्रारीचे निरसन केले नाही. त्यामुळे लोकशाहीतील शेवटचे आंदोलन म्हणून विविध मागण्यांसाठी बँक विकास आघाडीच्या वतीने प्रभाकर झोड यांचे नेतृत्वात गुरुवारपासून बेमुदत आमरण उपोषण आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

शिक्षक बँक ही सहकार कायद्यानुसार पगारदार कर्मचाऱ्यांची सहकारी बँक प्रवर्गात नोंदणीकृत आहे. पगारदार कर्मचाऱ्यांच्या संस्थेमध्ये सेवानिवृत्तीनंतर पदावर राहता येत नाही, परंतु विद्यमान अध्यक्षांनी निवृत्त झाल्यानंतरही पदाला चिकटून राहण्यासाठी बँकेला नागरी बँक बनविण्याचा बेकायदेशीर खटाटोप केला आहे. अध्यक्षाच्या या बेकायदेशीर गटकारस्थानाला विभागीय सहनिबंधकांनी मंजुरी देणे म्हणजे दिवसाढवळ्या बँकेला नागरी बँक करणे होय, शिक्षक बँकेला पगारदार कर्मचाऱ्यांची बँक म्हणून वाचविण्यासाठी आणि इतर अनेक महत्त्वाच्या विषयाबाबत केलेल्या तक्रारींची तातडीने चौकशी करण्यासाठी आमरण बेमुदत उपोषणा आंदोलन सुरू केले आहे. सर्व मागण्या पूर्ण होईपर्यंत आमरण आत्मक्लेष आंदोलन चालू राहील असा इशारा बँक विकास आघाडीच्या वतीने देण्यात आलेला आहे. सदर आंदोलनाला शिक्षक बँकेच्या अमरावती जिल्ह्यातील अनेक शिक्षक संघटनांसोबतच सामान्य सभासदांनीही मोठ्या प्रमाणावर पाठिंबा जाहीर केला आहे.

# तिवसातील तरुणीवर नोएडा येथे लैंगिक अत्याचार

**अमरावती,** - तिवसा पोलीस स्टेशन परिसरात राहणार्या एका 30 वर्षीय महिलेवर तरुणाने उत्तर प्रदेशातील नोएडा येथे लैंगिक अत्याचार केला, तर त्याच्या दोन मित्रांनी तरुणीचा विनयभंग केला. महिलेच्या तक्रारीवरून तिवसा पोलिसांनी 26 मार्च रोजी आरोपी अभिषेक चौहान (27), धीरज कुमार (29) आणि आझाद अली (28, तिघेही रा. आदर्श नगर, कोडा कॉलनी, गाझियाबाद, उत्तर प्रदेश) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तिवसा पोलीस स्टेशन परिसरात राहणारी 30 वर्षीय महिला उत्तर प्रदेशातील नोएडा येथील एका कंपनीत 2022 पासून काम करत होती. येथे तिची ओळख आरोपी अभिषेक चौहानसोबत झाली. अभिषेक चौहानही महिलेसोबत कंपनीत काम करत होता. मात्र 16 मार्च 2023 ते 1 जून 2023 या कालावधीत अभिषेकने महिलेला लग्नाचे आमिष दाखवून तिचे लैंगिक शोषण केले. तसेच अभिषेकचे मित्र धीरजकुमार आणि आझाद अली यांनी महिलेचा विनयभंग केला.




आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# कृत्रिम पाणवठ्यामुळे वन्यजीवांची तृष्णातृप्ती

## जिल्ह्याभरातील जंगलातील पाचशेवर कृत्रिम पानवठे

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 27) –** उन्हाला सुरु झाला की, पाण्यासाठी वन्यप्राण्यांची भटकंती सुरु होते. कारण जंगलातील नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत आटतात. परंतू वनविभागामार्फत तयार करण्यात आलेले कृत्रीम पानवठे वन्यप्राण्यांची तृष्णातृप्तीसाठी महत्वाचे ठरत आहे. जिल्ह्याभरातील जंगलात पाचशेवर कृत्रिम पानवठे तयार करण्यात आले असून, या पानवठ्यावर वनविभागाकडून पाणी पुरवठा केला जात आहे. त्यामुळे जंगलातील वन्यप्राण्यांना पाण्यासाठी भटकावे लागत नाही.

जिल्ह्याचा पारा 40 डीग्रीवर गेला आहे. उन्हामुळे शहर, ग्रामीण आणि जंगलातील नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत आटायला लागलेत. मेळघाटाच्या जंगलात भरपूर पाऊस पडत असला तरी पाणी डोंगरावरून खाली वाहून जाते. त्यामुळे या भागात पाण्याची टंचाई निर्माण होते. अशा परिस्थितीत उन्हाळ्यात वाघ, बिबट, अस्वल, रानगवे, सांबार, हरिण, नीलगाय या वन्यप्राण्यांसह विविध पक्ष्यांच्या तृष्णांतृप्तीसाठी व्याघ्र प्रकल्पांतर्गत कृत्रिम पाणवठे महत्वाचे पाणी स्त्रोत ठरत आहे. अमरावती जिल्ह्यातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पात गुगामल वन्यजीव विभाग, सिपना वन्यजीव विभाग, अकोट वन्यजीव विभाग, मेळघाट वन्यजीव विभाग असून, अमरावती प्रादेशिकमध्ये परतवाडा, चांदुररेल्वे, मोर्शी, वरुड, वडाळी अशी विभागणी आहे. या वनक्षेत्रातील बहुंताश नैसर्गिक पाण्याच्या स्त्रोतामध्ये पाणी आहे, तर काही पाण्याचे स्त्रोत आटले आहे. ज्या भागातील पाणी स्त्रोत आटले आहेत, त्या भागात कृत्रीम पानवठे वन्यप्राण्यासाठी तृष्णातृप्तीसाठी महत्वाचे ठरत आहे.



> उन्हाळ्यात नैसर्गिक स्त्रोतातील पाणी कमी होत असल्याने वन्यप्राण्यांसाठी कृत्रिम पानवठे तयार केले जाते. अमरावती वनविभागातंर्गत बरेचश्या ठिकाणी कृत्रिम पानवठे तयार करण्यात आली असून, त्यावर वन्यप्राण्यांची तहान भागत आहे. या पानवठ्यांवर पाणी उपलब्ध करून दिल्या जात आहे.
>
> **मयुर बैलुमे, एसीएफ, अमरावती वनविभाग,**

### सिमेंट बशी आणि पाणवठे

वनविभागामार्फत जानेवारी, फेब्रुवारी महिन्यापासूनच कृत्रिम पाणवठे निर्माण करण्याची तयारी केली जाते. जंगलात अनेक ठिकाणी सिमेंट बशी तयार करण्यात आली असून, त्यावर ताडपत्रीच्या सहाय्याने कृत्रिम पाणवठे तयार केली जातात. अमरावती शहरालगत असणार्या वडाळी वनपरीक्षेततंर्गत पोहरा, मालखेड परिसरात कृत्रीम पानवठे वन्यप्राण्यांची तहान भागवत आहे.

जंगलात ज्या भागात उन्हाळ्यातही पाणी असणारी विहीर आहे, यासह ज्या भागात बोअर आहे, अशा ठिकाणावरून सौर ऊर्जेचा वापर करून मशिनद्वारे कृत्रिम पाणवठ्यात पाणी पुरवठा केला जाते. जंगलात अनेक भागात सौर मोटरची व्यवस्था आहे. ज्या अडचणीच्या ठिकाणी सौर ऊर्जेची व्यवस्था नाही, अशा भागात असणाऱ्या सिमेंट बशी आणि कृत्रिम पाणवठ्यांमध्ये टँकरद्वारे पाणी भरलं जाते, अशी माहिती वडाळी वनपरीक्षेत्र अधिकारी वर्षा हरणे यांनी दिली.

# अचलपूरातील आरोग्य विभागच अंधारात

## पथदिवे बंद, रुग्णालय प्रशासनाने घ्यावी दखल

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर (दि.27) –** राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांनी सोमवारी (दि.24) अचलपूर शहरातील उपजिल्हा रुग्णालयाला भेट दिली. यानंतर त्यांचा ताफा अमरावती कडे रवाना झाला. मात्र अंधार होताच परिसरातील पथदिवे बंद झाल्याने परिसरात काळोख पाहायला मिळाला. उपजिल्हा रुग्णालयात अचलपूरच नव्हे तर मेळघाट व इतर ग्रामीण ,शहरी भागातील महिला प्रसूतीसाठी येतात.यामुळे रुग्णालयात रुग्ण व नातेवाईकांची प्रचंड गर्दी असते.



परिसरात रूग्णांच्या नातेवाईकांचा वावर असतो. यामुळे परिसरामध्ये पथदिवे बंद असल्याने कोणतीही अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.याची तत्काळ दखल अचलपूर उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाने घेऊन बंद पथदिवे तत्काळ सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# नि:शुल्क पशु शल्यचिकित्सा शिबिर

## गोकुलम गौरक्षण संस्थेचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.27 ) –** गौरक्षण संस्था नांदुरा येथे निशुल्क पशु शल्यचिकित्सा शिबिर रविवारी दि. 13 एप्रिल रोजी सकाळी 8 ते दुपारी 12 पर्यंत आयोजित करण्यात आले आहे.

स्वस्ती श्री त्रिवेणी फाउंडेशन मुंबई, जनकल्याण ग्रुप मुंबई, गोकुलम गौरक्षण संस्था नांदुरा बु. यांच्या संयुक्त विद्यामानाने भव्य पशु शल्यचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिरामध्ये पशु वैद्यकीय महाविद्यालय नागपूर, अकोला व पशुसंवर्धन विभागाचे तज्ञ डॉक्टर उपस्थित राहणार आहेत. सर्व पशुपालक व गोपालकांनी रविवारी दि. 13 एप्रिल रोजी सकाळी 8 ते दुपारी 12 पर्यंत गोकुलम गौरक्षण संस्था नांदुरा येथे आपल्या आजारी पशुसह उपस्थित रहावे.

सदर शिबिरामध्ये शस्त्रक्रिया विभाग,प्रशुप्रजनन विभाग,औषधोपचार विभाग या विभागातून पशुंवर उपचार करण्यात येणार आहे. यामध्ये शिंगाचा कॅन्सर, हर्निया, डोळ्याचा कॅन्सर, शेपटीचा कॅन्सर,पोटातून प्लास्टिक काढणे, रिंगणेचे ऑपरेशन, कुत्र्यांचे व मांजरीचे इतर ऑपरेशन तसेच घोड्याचे जेल्डिंग ऑपरेशन, गाई म्हशीची गर्भ तपासणी,वंधत्व तपासणी,वारंवार उलटणाऱ्या गाईची तपासणी,आजारी जनावरांचे रोग निदान व उपचार तज्ञ वैद्यकीय मंडळींकडून करण्यात येणार आहे. तरी या भव्य शिबिराचा लाभ सर्व गोपालक व पशुपालकांनी घ्यावा असे आवाहन गोकुलम गौरक्षण संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. शिबिरात पशुपालकांना जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे तसेच सर्व पशुंसाठी चाऱ्याची व्यवस्था देखील करण्यात येणार आहे. नोंदणी धारकांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल. शस्त्रक्रिया करिता जनावरे एक दिवस अगोदर रात्री 7 वाजता उपाशी ठेवावे व गोकुलम गौरक्षण संस्थेत उपचारासाठी दाखल करावे. अधिक माहितीसाठी डॉ.चंद्रशेखर गिरी (9371294391), वीरेंद्र कोरे (9325124891), अभिषेक मुरके (9665113111) यांच्याशी संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले.

# पी. आर. पोटे कृषी महाविद्यालयात कॅम्पस मुलाखती

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.27 ) –** पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेल तर्फे विद्यार्थ्यांना? नोकरीसाठी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले (दि.25) होते. जी. एन. एक्स. बायोकेम अॅग्रो प्रायव्हेट लि. कंपनीतर्फे विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. कंपनी तर्फे अॅडमिन प्रमुख सॅवीओ डिमेलो, प्रोडक्शन मॅनेजर ऋजुजा व त्यांच्या टीमने विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. या मुलाखतीसाठी महाविद्यालयाचे 32 विद्यार्थी उपस्थित होते. प्लेसमेंट सेलतर्फे रोजगाराच्या विविध प्रकारच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. या मुलाखतीसाठी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. वाय. ठाकरे,



उपप्राचार्य एन. बि. चौधरी व प्लेसमेंट सेल अधिकारी डॉ. अर्चना तसेच विद्यार्थी प्रतिनिधींनी सहकार्य केले. मुलाखतीनंतर कंपनीच्या सर्व वरिष्ठ प्रतिनिधींनी महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी चालू असलेल्या विविध प्रकल्पांची प्रत्यक्ष भेट देऊन माहिती जाणून घेतली व महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी राबवत असलेल्या उपक्रमांचे कौतुक केले.या माध्यमातून कंपनीच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधल्याने विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळणार आहे.



# शेतातील लाकडी साहित्य जळून खाक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 27) –** मार्चच्या अंतिम टप्प्यात सूर्य आग ओकु लागला आहे.छोट्या छोट्या चुकांमुळे मोठ्या-मोठ्या आगीच्या घटना घडत आहे.जंगल आणि शेत परिसरात आगीच्या घटना सर्वाधिक होत आहे. दरम्यान अशातच अचलपूर तालुक्यात चिखलदरा मार्गावरील धोतरखेडा येथे शेतकरी विकास खेरडे यांच्या शेतात संत्रा तोडण्यासाठी उपयोगात येणार्या लाकडी बास व बल्यांना (दि.25) अचानक आग लागली. त्यामुळे त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. एवढेच नव्हे तर संत्र्यांच्या अनेक झाडांना देखील नुकसान पोहोचले आहे. आता ही संत्र्यांची झाडे फळं देतील किंवा नाही याची काही शाश्वती नाही. शेतकरी खेरडे यांनी आपल्या शेतात फणसाच्या झाडाच्याखाली जवळपास 2500 पेक्षा अधिक बास आणि बल्ल्या ठेवल्या होत्या. या बास आणि बल्ल्याच्या आधारे ते झाडा वरून संत्रा तोडणार होते. मात्र अचानक या बल्ल्यामध्ये आग लागली. आगीने पाहता पाहता रौद्ररूप धारण केले आणि आगीवर नियंत्रण आनणे कठीण होऊन गेले.शेतात पाण्याची सुविधा फार दूर होती. त्यामुळे आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले गेले. मात्र तरी देखील लाकडी बल्या जळून गेल्या. अग्निशमन वाहन पोहोचेपर्यंत सर्व राख झाले होते. आगीच्या कारणाचा पत्ता लागला नसून यामध्ये मोठे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. अग्निशमन विभागाचे वाहन देखील उशिरा पोहोचल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे.

# राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेसाठी तृष्णा, अंशिका, श्रावणी, स्वास्तिका यांची निवड

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.27 ) –** बंगलोर येथे दि.4 ते 7 एप्रील ला होणाऱ्या सिनअर राष्ट्रीय डॉजबॉल महिलांच्या स्पर्धेमध्ये अमरावतीच्या वनवासी कनिष्ठ महाविदयालय चिखलदा येथील तृष्णा आगळेकर, अंशिका दिवाण तर तक्षशिला महाविद्यालयाची श्रावणी लोणारे व स्कूल ऑफ स्कॉलर्स धामणगाव रेल्वेची स्वस्तिका पौळ यांची महाराष्ट्र राज्याच्या डॉजबॉल संघामध्ये निवड झालेली आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे अमरावती जिल्हाचा महिला संघ राज्य अजिंक्यपद



डॉजबॉल स्पर्धेत सतत विजेता असतो. त्यामुळे वरील खेळाडूचे अमरावती शहरात सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांना शिवछत्रपती पुरूस्कार विजेते प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांचे मार्गदर्शन लाभले. महासचिव महाराष्ट्र डॉजबॉल असोसिएशन यांच्या प्रशिक्षणात अनेक डॉजबॉलचे खेळाडू राष्टीय व आंतरराष्टीय स्तरावर खेळले आहेत. निवड झालेल्या खेळाडूंचे डॉ. वसंत लुंगे, डॉ.आर.सी कपील, डॉ. सुरेश विधळे, अर्चना लुंगे, डॉ. हरीष काळे, अशोक खंडारे, विशाल पौळ, अतुल पडोळे, आनंद उईके, प्रफुल गाभने, अपूर्व ढोरे, संतोष किटकुले, आशिष ढोके, हेमंत देशमुख इत्यादीनी अभिंनदन केले.

# आजारी महिलेचा बेडवरून पडून मृत्यू

**अमरावती –** नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हैदरपुरा येथे राहणाऱ्या एका आजारी महिलेचा बेडवरून पडून मृत्यू झाला. फहेमिदा बी निजाम खान (वय 62) असे मृतक महिलेचे नाव आहे. फहेमिदा बी यांची गेल्या पाच ते सहा वर्षांपासून प्रकृती खराब होती. त्या अंथरुणाला खिळल्या आहेत.

### श्रीविठ्ठल रुख्माई संस्थान रेवसाची

# 30 कोटींची जमीन पुन्हा होणार देवस्थानच्या नावावर

## महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या पुढाकाराने मिळाला ऐतिहासिक विजय




### महासंघाची पत्रपरिषदेत माहिती

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.27 ) –** जिल्ह्यातील रेवसा येथील श्रीविठ्ठल रुख्माई संस्थान यांच्या मालकीची तब्बल 30 कोटी रुपयांची मौल्यवान शेतजमीन अखेर देवस्थानच्या नावावर पुन्हा नोंदवली जाणार आहे. मंदिर महासंघाच्या प्रभावी पाठपुराव्यामुळे हा ऐतिहासिक विजय मिळाला आहे. महसूल कर्मचाऱ्यांच्या संगनमतातून हडप केलेली ही जमीन परत मिळाल्याने भक्तगणांमध्ये समाधानाचे वातावरण असल्याची माहिती बुधवारी (दि.26) आयोजित पत्रकारपरिषदेत देण्यात आली. मंदिर महासंघाचे राज्य पदाधिकारी अनुप प्रमोद जयस्वाल यांनी ही माहिती दिली.

यावेळी महासंघाचे जिल्हा संयोजक विनीत पाखोडे, हिंदू जनजागृती समितीचे जिल्हा समन्वयक निलेश टवलारे, अधिवक्ता अभिजीत बजाज संस्थानचे विश्वस्त राजेंद्र वाकोडे आणि हरीभाऊ वाकोडे, हरिदास मानवटकर, समितीचे सचिन वैद्य उपस्थित होते. यावेळी त्यांनी पुढे सांगितले की, मौजा रेवसा येथील गट क्र. 165, क्षेत्रफळ 3 हेक्टर 69 आर ही शेतजमीन श्रीविठ्ठल रुख्माई संस्थानच्या मालकीची आहे. मात्र, ही जमीन हडप करण्याच्या उद्देशाने प्रदीप त्र्यंबकराव वाकोडे व प्रवीण त्र्यंबकराव वाकोडे यांनी तत्कालीन तहसीलदार संतोष काकडे यांच्यासमोर जमिनीच्या 7/12 उताऱ्यावरील संस्थानचे नाव कमी करून स्वत:च्या नावावर नोंद करण्यासाठी अर्ज सादर केला. 09 मे 2022 रोजी तहसीलदार काकडे यांनी महसूल कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन करून 7/12 उताऱ्यातून संस्थानचे नाव कमी केले आणि वाकोडे बंधूंच्या नावावर बेकायदेशीर नोंद केली. या निर्णयाविरोधात राजेंद्र पद्माकर वाकोडे यांनी उपविभागीय अधिकारी अमरावती यांच्यासमोर अपील दाखल केले. अपील प्रकरणात वाकोडे बंधू आणि महसूल कर्मचाऱ्यांच्या संगनमताचा पर्दाफाश झाला. तहसीलदार काकडे यांनी पारीत केलेला आदेश हा आर्थिक लाभ घेण्याच्या दृष्टीनेच करुन घेतल्याचे स्पष्ट दिसून येत असल्याचे निष्कर्ष आयएस अधिकारी रिचर्ड यंथन यांनी नोंदवून 1 ऑगस्ट 2023 रोजी तहसीलदार काकडे यांचा आदेश रद्द केला. देवस्थान शेत जमिनीबाबत होणाऱ्या गैर प्रकरणात आळा घालून भ्रष्ट अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यासाठी राज्यात ?न्टी लॅंड ग्रँबीग कायद्याची आवश्यकता आहे व त्याची तरतुद राज्य शासनाने करावी यासाठी मंदिर महासंघाने शासनाकडे मागणी केली आहे.

### मंदिर महासंघाचा पाठपुरावा

या आदेशामुळे महसूल विभागासाठी हा निर्णय गळफास ठरला. उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशावरील अपिल प्रकरणात अतिरिक्त जिल्हाधिकारी अमरावती यांनी प्रकरणाचा अधिक सखोल तपास करून पुन्हा सुनावणीचे निर्देश दिले. मंदिर महासंघाने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार देवस्थानच्या हितासाठी तहसीलदारांना निवेदन दिले. या पाठपुराव्याला यश मिळाले आणि तहसीलदार विजय लोखंडे यांनी 20 मार्च 2025 रोजी सावध भूमिका घेत संस्थानच्या बाजूने अंतिम निर्णय दिला असल्याचे पत्रपरिषदेत सांगण्यात आले आहे.


# रासेयो राष्ट्रीय एकात्मतेसाठीचे सशक्त साधन - प्रा. डॉ. हेमंत देशमुख

## राम मेघे इन्स्टिट्यूटचे श्रमसंस्कार शिबीर ■ वडद येथे राबविले विविध उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.27 ) –** विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी द्वारा संचालित प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च बडनेरा येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर नजीकच्या दत्तकग्राम वडद येथे 17 ते 24 मार्च या कालावधीत संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख यांच्या हस्ते झाले.

उद्घाटनप्रसंगी प्रा. डॉ. हेमंतजी देशमुख यांनी रासेयोचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करणे, त्यांना समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा देणे, त्यांच्यात नेतृत्व क्षमता विकसित करणे, समाजातील विविध समस्या व गरजांची जाणीव करून देणे व विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास वाढविणे या विषयांना धरून मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच रासेयो च्या माध्यमातून समाज व स्वयंसेवक दोघेही कसे विकसित होतात हे समजावून





सांगितले. रासेयो राष्ट्रीय एकात्मतेसाठीचे सशक्त साधन असल्याचे ते म्हणाले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजेंद्र बमनोटे, अमरावती विद्यापीठाचे रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष भोपळे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. विजय काळे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. नुपूर यावले व डॉ. नीलिमा दांडगे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. मयूर तिवारी, प्रा. चेतन बुंदेले, डॉ. प्रिया गाडवे, डॉ. अमित जाधव, प्रा. आशुतोष विरखरे, प्रा. निखिल बंड, प्रा. कार्तिक देशमुख, प्रा. कु. मेघना देशमुख, प्रा. कु. नीलजा देशमुख, कोंडेश्वर संस्थानचे अध्यक्ष रमेश पकडे, सचिव रवींद्र बारापात्रे व अतुल खडसे तसेच स्वयंसेवक व गावकरी उपस्थित होते.

प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष भोपळे यांनी केले. प्रा. विजय काळे यांनी युवा चळवळ व राष्ट्रीय सेवा योजना या विषयावर व्याख्यान दिले. सात दिवसाच्या या शिबिरात सकाळी योगासने व प्राणायाम, श्रमदान, बौद्धिक सत्र, प्रार्थना व स्फूर्ती गीते तसेच सांस्कृतिक कार्यक्रम या दैनंदिन कार्यक्रमांचा समावेश होता. शिबिरादरम्यान बौद्धिक सत्रामध्ये डॉ. निशिकांत काळे, प्रा. अनिल प्रांजळे, डॉ. आशय रोकडे, डॉ. निक्कू खालसा, प्रा. युवराज वैद्य, प्रा. विवेक राऊत, डॉ. प्रदीप इंगोले, डॉ. सीमा देशमुख, प्रा. चेतन बुंदेले यांनी विविध विषयांवर व्याख्याने दिली.

श्रमदानामध्ये स्वयंसेवकांनी स्वच्छ भारत-स्वस्थ भारत अभियान, वृक्षारोपण, मतदार जनजागृती अभियान, रक्त, दंत व आरोग्य तपासणी शिबिर, शाळेतील विद्यार्थ्यांचे संगणक प्रशिक्षण, तलावाचे सौंदर्यीकरण व खोलीकरण, पक्षांसाठी जलपात्र वाटप, ग्रामीण स्वयंरोजगार योजना, अंधश्रद्धा निर्मूलन जनजागृती, व्यसनमुक्ती, महिला सक्षमीकरण, व्यक्तिमत्व विकास, पर्यावरण जनजागृती असे विविध कार्यक्रम आयोजित केले ज्यामध्ये गावकर्यांनी व शेतकर्यांनी विशेष उत्साह दाखविला. रासेयो शिबिराच्या यशस्वितेसाठी विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष अॅड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे, डॉ. सौ. पुनम चौधरी, प्रा. विनय गोहाड, पंकज देशमुख, गजानन काळे यांचे मार्गदर्शन लाभले. शिबिराच्या आयोजनाकरिता महाविद्यालयाचे डायरेक्टर ऑटोनोमी डॉ. दिलीप इंगोले, डीन डॉ. हर्षद देशमुख, डॉ संजय देशमुख, डॉ. समीर देशमुख, डॉ. निक्कू खालसा, विभाग प्रमुख डॉ. शिरीष पट्टलवार, डॉ. महेंद्र पुंड, डॉ. चंद्रशेखर देशमुख, डॉ. अनुप शिरभाते, डॉ. नितीन इंगोले, डॉ. प्रशांत इंगोले, डॉ. सुनील गुप्ता, डॉ. सौ. सीमा देशमुख, डॉ. आशिष देशमुख, प्रा. सौ. रूपाली शेरेकर, डॉ. सौ. वैशाली देशमुख यांचे सहकार्य लाभले.

# मोदी सरकारने आधीच्या सरकारच्या तुलनेत केंद्र निधीतून राज्यांना तीन पट अधिक निधी दिला: अमित शाह



**मुंबई, २७ मार्च :** केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री तसेच भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते अमित शाह यांनी राज्यसभेत आपत्ती व्यवस्थापन (सुधारणा) विधेयक, २०२४ वरील चर्चांना उत्तरे दिली. त्यानंतर सभागृहाने हे विधेयक मंजूर केले. या वेळी अमित शाह यांनी स्पष्ट केले की पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारची भूमिका केंद्र, राज्य सरकारे, सर्व पंचायत आणि नागरिकांना जोडून आपत्ती व्यवस्थापन बळकट करण्याची असून यासाठी सत्तेचे केंद्रीकरण करण्याचा प्रश्नच नाही.

या विधेयकाच्या माध्यमातून आपत्तीविरोधातील लढाईला केवळ प्रतिक्रियात्मक दृष्टिकोनातून पुढे न नेता ती सक्रिय, नाविन्यपूर्ण आणि सहभागी दृष्टिकोनाकडे नेण्याचा प्रयत्न केला आहे. अंत्योदयच्या तत्त्वांवर चालणाऱ्या शाह यांच्या धोरणांतर्गत या विधेयकात संस्थांच्या अधिकार आणि जबाबदाऱ्या स्पष्ट करण्यात आल्या आहेत.

आपत्ती व्यवस्थापनाला नव्याने परिभाषित करताना शाह यांनी सांगितले की १५व्या वित्त आयोगाने आपत्ती मदतीसाठी वैज्ञानिक पद्धतीने निधी ठरवला आहे आणि मोदी सरकारने कोणत्याही राज्याचा निधी कमी केलेला नाही, उलट निर्धारित रकमेपेक्षा अधिक निधी दिला आहे. आकडेवारीनुसार हे स्पष्ट होते की आधीच्या सरकारच्या तुलनेत मोदी सरकारने राज्यांना तीन पट अधिक निधी दिला आहे.

संपूर्ण देशाला माहीत आहे की कोविड-१९सारखी जागतिक आपत्ती, शहरीकरणाचा वाढता वेग, अनियमित पाऊस आणि हवामान बदलामुळे आपत्तींचा प्रमाण आणि स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलले आहे. अशा परिस्थितीत बदलत्या आपत्तींच्या स्वरूपाला तोंड देण्यासाठी व्यवस्थांमध्ये सुधारणा करणे, संस्थांना जबाबदार धरणे आणि त्यांना सक्षम बनवणे यासाठी मोदी सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली हे विधेयक प्रतिसादक्षमतेला क्षमता, गती, कार्यक्षमता आणि अचूकतेसह एकत्र करते. हे प्रतिक्रियात्मक प्रतिसादाच्या ऐवजी सक्रिय धोका कमी करणे, मॅन्युअल मॉनिटरिंगच्या ऐवजी एआय तंत्रज्ञान आधारित रिअल टाइम मॉनिटरिंग, केवळ रेडिओ चेतावणीऐवजी सोशल मीडिया, मोबाईल ॲप्सच्या मदतीने सतर्कता आणि केवळ सरकारी प्रतिसादाऐवजी नागरिक आणि समाजाचा सहभाग असलेला बहुआयामी प्रतिसाद सुनिश्चित करण्याचे प्रावधान यात आहे. मोदी सरकारने केवळ मदत-केंद्रित दृष्टिकोनावर भर न देता एक व्यापक आणि सर्वसामावेशक दृष्टिकोन स्वीकारला आहे. यामध्ये किमान जीवितहानी च्या ऐवजी शून्य जीवितहानी चे लक्ष्य ठेवत आपत्ती व्यवस्थापन प्रत्यक्षात उतरवले आहे. मोदी यांच्या दूरदृष्टीमुळे आणि शाह यांच्या व्यवस्थापन कौशल्यामुळे अर्ली वॉर्निंग सिस्टम, प्रतिबंध, शमन, वेळेवर तयारी आणि आपत्ती धोका कमी करण्यासाठी अभूतपूर्व कार्य झाले आहे.

उदाहरणार्थ, १९९९ मध्ये जेव्हा ओडिशा सुपर सायक्लोन आला होता तेव्हा १०,००० लोकांचा मृत्यू झाला. मात्र, २०१९ मध्ये जेव्हा चक्रीवादळ फानी आले तेव्हा केवळ एका व्यक्तीचा मृत्यू झाला. २०२३ मध्ये गुजरातमध्ये आलेल्या बिपरजॉय चक्रीवादळात एकाही व्यक्ती किंवा प्राण्याचा मृत्यू झाला नाही आणि भारताने शून्य जीवितहानी चे लक्ष्य साध्य केले.

मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि अमित शाह यांच्या धोरणांमुळे गेल्या काही वर्षांत आपत्ती व्यवस्थापनात मोठे परिवर्तन झाले आहे. त्यामुळे भारत केवळ राष्ट्रीयच नव्हे, तर प्रादेशिक आणि जागतिक पातळीवरही आपत्ती व्यवस्थापनातील एक प्रभावी शक्ती बनला आहे.

# ओराचे गुढीपाडव्यासाठी नवीन उत्सवी ज्वेलरी कलेक्शन



**मुंबई, २७ मार्च :** गुढीपाडवा सण हिंदू नववर्ष शुभारंभाचे प्रतीक आहे, नवीन सुरूवात व समृद्धतेचा काळ आहे. हा सण जल्लोषात साजरा केला जातो, तसेच या सणाला शुभ भाग्याचे प्रतीक म्हणून खरेदी केली जाते. भारतातील आघाडीचा डायमंड ज्वेलरी ब्रँड ओरा ग्राहकांमध्ये लोकप्रिय आहे. ट्रेण्ड्स कायम ठेवण्यासोबत ग्राहकांच्या मागण्यांची पूर्तता होण्याची खात्री घेण्यासाठी ब्रँडने गुढीपाडव्याकरिता आकर्षक डिझाइन्सचे अनावरण केले, ज्यामध्ये परंपरा आणि समकालीन आकर्षकतेचे उत्तम संयोजन आहे.

यंदा सणासुदीच्या काळात ओरा उत्सवी पेहरावांमध्ये अधिक आकर्षकतेची भर करण्यासाठी समकालीन डिझाइन्स सादर करत आहे. या नवीन उत्सवामध्ये लक्षवेधक हिरेजडित मंगळसूत्र आहे, जे पैठणी व नऊवारी साड्यांवर शोभून दिसण्यासाठी बारकाईने डिझाइन करण्यात आले आहे. या मास्टरपीसला पूरक मॅचिंग इअररिंग्स, आकर्षक अंगठी आणि आकर्षक ब्रेसलेटचे संयोजन आहे. प्रत्येक पीस उत्सवी उत्साहामध्ये अधिक आनंदाची भर करण्यासाठी विचारपूर्वक डिझाइन करण्यात आला आहे. या नवीन फेस्टिव्ह डिझाइन्समध्ये कालातीत परंपरा आणि आधुनिक कलाकृतीचे परिपूर्ण संतुलन आहे.

ओरा फाइन ज्वेलरीचे व्यवस्थापकीय संचालक दिपू मेहता म्हणाले, गुढीपाडवा सण नववर्ष शुभारंभाचे आणि समृद्धता व आनंदाने भरलेल्या प्रवासाचे प्रतीक आहे. ओरामध्ये, आम्ही हिऱ्यांच्या दागिन्यांसह हा शुभ सण साजरा करतो, ज्यामधून भारतातील संपन्न सांस्कृतिक वारसा दिसून येतो, ज्यामध्ये पारंपारिक कलाकृती आणि आधुनिक आकर्षकतेचे संयोजन आहे. आम्ही ग्राहकांना ओराच्या आकर्षक ज्वेलरी डिझाइन्ससह या सणाचा आनंद घेण्याचे आणि प्रत्येक नवीन सुरूवात खऱ्या अर्थाने उत्साहपूर्ण करण्याचे आवाहन करतो.''

या फेस्टिव्ह कलेक्शनव्यतिरिक्त ओरा प्रत्येक प्रसंगासाठी आकर्षक दागिन्यांचा खजिना देखील देत आहे. जसे एकता' - द वेडिंग कलेक्शन, जे अंतर्गत नात्यांना साजरे करते; ॲस्ट्रा, जे आधुनिक काळातील महिलांच्या उत्साहाचे प्रतीक आहे आणि सोलिस - दैनंदिन परिधानासाठी खास श्रेणी. प्रत्येक कलेक्शनमधून कारागिरी व सर्वोत्तमतेप्रती ओराची समर्पितता दिसून येते, जे ग्राहकांच्या मागण्या व पसंतींची पूर्तता करतात.

# एअरटेलची आय.पी.टी.व्ही सेवा महाराष्ट्रभर सुरू

**पुणे, २७ मार्च :** भारती एअरटेल ही भारतातील अग्रगण्य दूरसंचार सेवा पुरवठादारांपैकी एक आहे आणि ग्राहकांना मोठ्या पडद्यावर (स्क्रीनवर) पाहण्याचा उत्तम अनुभव उपलब्ध व्हावा म्हणून तिने संपूर्ण महाराष्ट्रात आय.पी.टी.व्ही सेवा सुरू केली आहे. ग्राहकांना २९ प्रमुख स्ट्रीमिंग ॲप्समधून मागणीनुसार आशयाचा विस्तृत संदर्भविभाग (लायब्ररी) उपलब्ध होणार असून त्यात सामील आहेत- स्टेज, सोनी लिव्ह, नेटफ्लिक्स, ॲपल टीव्ही+, ॲमेझॉन प्राईम, झी५, ६०० लोकप्रिय टेलिव्हिजन चॅनल्स आणि रु. ६९९ पासून सुरू होणाऱ्या प्लॅन्स मध्ये वाय-फाय सेवा मिळणार आहे. एक प्रारंभिक ऑफर म्हणून, सर्व एअरटेल ग्राहकांना आय.पी.टी.व्ही प्लॅन्सच्या खरेदीवर ३० दिवसांपर्यंत विनामूल्य सेवा मिळणार असून या सेवेचा लाभ एअरटेल थँक्स ॲपद्वारे घेता येणार आहे.

या लाँचविषयी भाष्य करताना जॉर्ज माथेन, सीईओ भारती एअरटेल, महाराष्ट्र आणि गोवा, म्हणाले, करमणूक हा फार पूर्वीपासून महाराष्ट्राच्या व गोव्याच्या उत्साही संस्कृतीचा जपलेला आणि अविभाज्य भाग आहे. आज आम्ही आनंदाने महाराष्ट्र आणि गोव्यात आमची अत्याधुनिक आय.पी.टी.व्ही सेवा सुरू करण्याची घोषणा करीत आहोत. ही सेवा आमच्या ग्राहकांसाठी तल्लीन करणाऱ्या अनुभवांचा एक नवा काळ सुरू करणार आहे. या लाँचमुळे आम्हाला खात्री आहे की आम्हाला एक असे नवीन मानक स्थापित करता येईल जे महाराष्ट्र आणि गोव्यातील लोकांच्या आकांक्षांशी आणि इच्छांशी सुसंगत असेल.

# पॅनासोनिककडून पश्चिम भारतात २०२५ एसी लाइन-अप लाँच

## जवळपास ५५ अंश सेल्सिअसपर्यंतच्या प्रखर तापमानामध्ये टिकून राहण्यासाठी डिझाइन करण्यात आलेले एसी

**नागपूर, २७ मार्च :** पॅनासोनिक लाइफ सोल्यूशन्स इंडिया या एअर कंडिशनर्स (एसी) उत्पादित करण्यामध्ये ६५ वर्षांहून अधिक काळाचा अनुभव असलेल्या आघाडीच्या वैविध्यपूर्ण तंत्रज्ञान कंपनीने आज पश्चिम भारतात आपल्या एअर कंडिशनर्सची २०२५ लाइन-अप लाँच केली आणि नागपूर कंपनीसाठी महत्त्वपूर्ण बाजारपेठ आहे. पॅनासोनिकची रेसिडेन्शियल एअर कंडिशनर्स (आरएसी)ची नवीन श्रेणी स्मार्ट राहणीमानाला नव्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी आणि कडक उन्हाळ्यादरम्यान जवळपास ५५ अंश सेल्सिअस प्रखर तापमानामध्ये टिकून राहण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. १.० टन, १.५ टन व २.० टनमधील ६१ नवीन मॉडेल्स असलेली नवीन श्रेणी आता ग्राहकांसाठी सर्व आघाडीचे आऊटलेट्स, ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्स आणि https://store.in.panasonic.com/air-conditioners.html येथे पॅनासोनिक ब्रँड स्टोअरमध्ये उपलब्ध आहे.

एअर कंडिशनर्सची २०२५ श्रेणी पॅनासोनिकचे आयओटी-सक्षम कनेक्टेड लिव्हिंग प्लॅटफॉर्म मिराई ॲपच्या माध्यमातून नियंत्रित करता येऊ शकते. यामध्ये अद्वितीय स्लीप प्रोफाइल वैशिष्ट्य आहे, जे ग्राहकांना शांतमय झोपेच्या खात्रीसाठी आपोआपपणे रूममधील तापमान समायोजित करण्यास मदत करते.

श्री. अभिषेक वर्मा, बिझनेस हेड, एअर कंडिशनर्स ग्रुप, पीएमआयएन, पीएलएसआयएनडी म्हणाले, भारतात एसीचे प्रमाण सध्या ७ ते ८ टक्के आहे आणि बाजारपेठ (२०२३-२०२९) मध्ये १६.५ टक्के सीएजीआर* दराने विकसित होण्याची अपेक्षा आहे. पॅनासोनिकच्या एसींनी एप्रिल-मार्च २०२५ मध्ये उद्योगामधील सरासरीपेक्षा जवळपास ४५ टक्के उच्च वाढीची नोंद केली आहे आणि नागपूर या वाढीमध्ये प्रबळ योगदानकर्ता म्हणून कायम आहे. पश्चिम भारत आमच्या विद्यमान (कॅलेंडर वर्ष - सीवाय-२४) एसी मार्केट शेअरमध्ये जवळपास २४ टक्क्यांचे योगदान देते आणि नागपूर आमच्यासाठी महत्त्वपूर्ण प्रांत आहे. स्मार्ट, ऊर्जा-कार्यक्षम, इन्व्हर्टर एसींसाठी प्रबळ मागणी पाहता आम्हाला यंदाच्या सीझनमध्ये (सीवाय'२५) पश्चिम भारतात ४५ टक्के वाढ होण्याची अपेक्षा आहे.''

वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी आणि ग्राहकांचे जीवन अधिक सोईस्कर व आरामदायी करण्याकरिता ग्राहक अभिप्रायाच्या आधारावर आम्ही ६१ नवीन आरएसी मॉडेल्ससह आमची एसी लाइन-अप अधिक दृढ केली आहे, जी उद्योगामधील स्मार्ट आरएसीच्या व्यापक श्रेणीपैकी एक आहे. आरएसीच्या स्मार्ट श्रेणीमध्ये मॅटर, मिराई, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय), नॅनो एअर प्युरिफिकेशन टेक्नॉलॉजीज, वन टच सर्विस, ७-इन-१ कन्वर्टिबल, उच्च दर्जाच्या एअरफ्लो कार्यक्षमतेसह इकोटफ आऊटडोअर युनिट यांसारखी तंत्रज्ञाने आहेत. तसेच, २०२५ लाइन-अपसंदर्भात आम्ही आता ग्राहकांच्या स्मार्ट होम अनुभवाला नव्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी मिराई प्लॅटफॉर्मद्वारे समर्थित आमच्या ३-स्टार इन्व्हर्टर आरएसींमध्ये मॅटरचा समावेश केला आहे. यामुळे सोयीसुविधा वाढण्यासोबत ग्राहकांसाठी मालकीहक्काचा एकूण खर्च देखील सुधारतो,'' असे वर्मा पुढे म्हणाले.

एअर कंडिशनर्सच्या नवीन श्रेणीच्या लाँचला सर्वांगीण मार्केटिंग कॅम्पेनचे पाठबळ असेल, ज्यामध्ये नवीन टीव्हीसीचा समावेश आहे.

# अभिनेत्रींनी सांगितल्या त्यांच्या आवडत्या होममेड समर ड्रिंक रेसिपी!



मुंबई, २७ मार्च : मार्च महिना संपत आला असताना संपूर्ण भारतात उन्हाळ्याचा उकाळा जाणवू लागला आहे. तापमान वाढत असताना उष्णतेवर मात करण्यासाठी रिफ्रेशिंग होममेड समर ड्रिंक उत्तम ठरते. एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री स्मिता साबळे (धनिया, 'भीमा'), गीतांजली मिश्रा (राजेश, 'हप्पू की उलटन पलटन') आणि विदिशा श्रीवास्तव (अनिता भाबी, 'भाबीजी घर पर हैं') त्यांच्या मूळगावामधील उन्हाळ्यामध्ये थंडावा देणाऱ्या समकालीन आवडत्या पेयांबाबत सांगत आहेत, जे त्यांना रिफ्रेश व उत्साहित राहण्यास मदत करतात. मालिका 'भीमा'मधील महाराष्ट्रीयन स्मिता साबळे ऊर्फ धनिया म्हणाल्या, ''सोलकढी हे उन्हाळ्यामधील माझे आवडते पेय आहे. कोकम व कोकोनट मिल्कसह हे पेय बनवले जाते. महाराष्ट्रीयन व कोकणी घरांमध्ये हे प्रमुख पेय आहे. सोलकढी शरीराला थंडावा देण्यासोबत पचनास मदत करते, ज्यामुळे उन्हाळ्यातील परिपूर्ण रिफ्रेशर आहे. मला आंबट-गोड कैरीपासून बनवले जाणारे पेय कैरीपन्हे देखील आवडते, जे मला कडाक्याच्या उकाड्यादरम्यान उत्साहित व हायड्रेटेड ठेवते.''

मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये राजेशची भूमिका साकारणाऱ्या गीतांजली मिश्रा म्हणाल्या, ''उत्तरप्रदेशमधील असल्यामुळे माझे आवडते समर ड्रिंक आहे बेल शरबत. बेलच्या लगद्यापासून बनवले जाणाऱ्या या समकालीन थंड पेयामध्ये पौष्टिक घटक असतात, तसेच हे पेय पचनास मदत करते आणि शरीराला थंड ठेवते. मला आवडणारे आणखी एक पेय म्हणजे सत्तू सरबत, जे भाजलेले बेसन, काळे मीठ आणि लिंबूपासून बनवले जाते. हे पेय त्वरित ऊर्जा वाढवणारे आहे आणि दिवसभर मला ताजेतवाने ठेवते.'' मालिका 'भाबीजी घर पर है'मधील वाराणसीच्या विदिशा श्रीवास्तव ऊर्फ अनिता भाबी म्हणाल्या, ''उन्हाळ्यामध्ये आमच्या घरामध्ये थंडाईचा आस्वाद नक्की घेतला जातो. दूध, काजू, केसर आणि सुगंधी मसाल्यांच्या मिश्रणासह हे पेय बनवले जाते, जे थंडावा व उत्साह देते. मला जलजीरा प्यायला देखील आवडते. हे आंबट व मसालेदार जिरे असलेले पेय पचनास मदत करते आणि शरीराला त्वरित उत्साहित करते. ही पेये स्वादिष्ट असण्यासोबत आमची संस्कृती व परंपरांमध्ये खोलवर रूजलेली आहेत.''

# नवीन क्लासिक ६५० : नवीन अवतारामध्ये कालातील आकर्षकता



**मुंबई, २७ मार्च :** रॉयल एनफिल्ड या मध्यम आकाराच्या (२५० सीसी - ७५० सीसी) मोटरसायकल श्रेणीमधील जागतिक अग्रणी कंपनीने आज भारतात क्लासिक ६५० लाँच केली, जिची किंमत ३,३७,००० रूपयांपासून सुरू होते. क्लासिक श्रेणीचा वारसा अधिक दृढ करत क्लासिक ६५० मध्ये कालातीत आकर्षकता, आधुनिक डिझाइन शैली आणि अत्याधुनिक कारागिरीसह मोटरसायकलिंगचा उत्साह सामावलेला आहे.

मोटरसायकलपेक्षा अधिक असलेली क्लासिक सांस्कृतिक आविष्कार राहिली आहे. रॉयल एनफिल्डच्या हिस्ट्रीमध्ये खोलवर सामावलेल्या क्लासिकचा वारसा मोटरसायकलिंगच्या सुवर्ण युगापासून आहे. क्लासिक ६५० मोटरसायकलमध्ये वारसासह आधुनिकता, परंपरेसह नाविन्यता आणि जुन्या आठवणींसह समकालीन कारागिरीचे उत्तम संयोजन आहे. प्रत्येक कडा, प्रत्येक पॉलिश करण्यात आलेले मेटल ॲसेंट आणि प्रत्येक सिग्नेचर डिझाइन मोटरसायकल्स निर्माण करण्यात आलेल्या काळाची गाथा सांगतात, जी आजीवन स्मरणात राहिल.

रॉयल एनफिल्ड 'क्लासिक'ने आकर्षक व अद्वितीय स्वरूपात आरई डीएनएचे प्युअर स्वरूप कायम ठेवले आहे. ही मोटरसायकल विविध रॉयल एनफिल्ड मोटरसायकल मॉडेल्सचा पाया राहिली आहे, तसेच या मोटरसायकलने अद्वितीय दर्जा, कालातीत आकर्षकता, प्राचीन मोहकता आणि वैशिष्ट्यपूर्ण, अविरत विशिष्टता कायम राखली आहे. सर्वोत्तम कारागिरी आणि डिझाइन शैलीसह क्लासिकने क्लासिक ऑटोमोटिव्ह डिझाइन, आकर्षकता व रचनेची संस्कृती सादर केली आहे.

क्लासिक ६५० च्या लाँचबाबत मत व्यक्त करत आशयर मोटर्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि रॉयल एनफिल्डचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) बी. गोविंदराजन म्हणाले, ''क्लासिक ६५० मोटरसायकलपेक्षा अधिक आमच्या संपन्न वारसाला मानवंदना आहे, जेथे कालातीत डिझाइन आणि प्रभावी कार्यक्षमता एकत्र येतात. ही मोटरसायकल रॉयल एनफिल्डच्या उत्साहाला पुढे घेऊन जाते, जी कारागिरीला एकत्र करत राइडर व मशिनमध्ये अतूट नाते निर्माण करते. आमच्या प्रमाणित ६५० सीसी पॅरेलल ट्विन प्लॅटफॉर्मवर डिझाइन करण्यात आलेल्या या मोटरसायकलमध्ये सुधारणा, क्षमता व रस्त्यावरील प्रबळ उपस्थितीचे परिपूर्ण संयोजन आहे, ज्यामुळे क्लासिकचे डीएनए आवडणाऱ्यांसाठी, तसेच अधिक शक्ती व वैविध्यतेचा शोध घेणाऱ्यांसाठी अधिक महत्त्वाकांक्षी निवड आहे. क्लासिक ६५० सह आम्ही मोटरसायकल्स डिझाइन करण्यासोबत भावी पिढ्यांसाठी प्युअर मोटरसायकलिंगच्या पैलूचे जतन देखील करत आहोत. आम्हाला भारतात ही आयकॉनिक मशिन सादर करण्याचा आनंद होत आहे आणि मला विश्वास आहे की ही मोटरसायकल तीच पॅशन कायम राखेल, जी आम्ही रायडिंग समुदायाला नव्या उंचीवर घेऊन जाईल.''

# सोनी सबवरील वीर हनुमान मालिकेत मारुतीची सूर्याकडे धाडसी झेप- देव त्याला वेळेवर रोखू शकतील का?

**मुंबई, २७ मार्च :** बाल हनुमानाच्या सुरस कथा सादर करून सोनी सबवरील वीर हनुमान मालिकेने प्रेक्षकांना भक्तीरसात गुंतवून ठेवले आहे. खोडकर मारुतीचे महावीर हनुमानात रूपांतर होण्याची कथा विशद करणाऱ्या या मालिकेच्या कथाभागात मारुतीची निरागसता, हिंमत आणि दिव्य नियती यांचे हृद्य मिश्रण दिसते. या मालिकेत छोट्या मारुतीची भूमिका केली आहे, आन तिवारीने, तर केसरी आणि अंजनी या भूमिका साकारल्या आहेत अनुक्रमे आरव चौधरी आणि सायली साळुंखे या कलाकारांनी. वाली आणि सुग्रीव अशी दुहेरी भूमिका करत आहे माहिर पांधी. वीर हनुमान मालिका सोमवार ते शनिवार रात्री ७:३० वाजता प्रसारित होते.

अलीकडच्या भागांमध्ये प्रेक्षकांनी मारुतीचे बाल-सुलभ कुतूहल पाहिले. या कुतुहलापोटीच तो महालाच्या भिंतींच्या बाहेर येतो. भूक आणि अदम्य ऊर्जा यांनी त्याचे शरीर सळसळते आहे. त्याला एका टोपलीत पिकलेले आंबे ठेवलेले दिसतात आणि त्याच्या डोक्यात एक धाडस करण्याची खुमखुमी येते. पण त्याची भूक सर्वसामान्य नाही. त्याचे लक्ष आकाशात उगवणाऱ्या लाल भडक तेजस्वी सूर्याकडे जाते आणि त्याला वाटते की हे सर्वात सुंदर असे रसाळ फळ असावे. हे फळ मिळवण्यासाठी तो पृथ्वीवरून आकाशाकडे झेप घेतो. या मार्गात त्याला शक्तीशाली जटायू (भीमराज मालाजी) आणि राहू (सौरभ कौशिक) सहित विविध शक्तीशाली देवता भेटतात व त्यांच्यात थरारक सामना होतो. सूर्याला गिळण्यासाठी मारुतीने घेतलेली ही झेप पाहून साक्षात देव देखील भयभीत होतात.

पण सूर्याला गिळून सौर मंडल विस्कळित करणाऱ्या मारुतीला देव थांबवू शकतील का? की बाल हनुमानाच्या या दिव्य खोडीमुळे सर्वत्र गोंधळ माजेल?

वीर हनुमान मालिकेत अंजनीची भूमिका करणारी सायली साळुंखे म्हणते, मारुतीच्या प्रवासात त्याच्यातील प्रचंड कुतूहल, निरागसता आणि अदम्य ऊर्जा यांचे चित्रण आहे. आपल्या खेळकर स्वभावाने प्रेरित होऊन तो एक अनपेक्षित साहस करतो. सूर्य हे एक सोनेरी, रसाळ फळ आहे असे वाटून त्याच्या बालसुलभ भुकेचे अचानक एका असामान्य प्रवासात रूपांतर होते. या कथेत मारुतीची अदम्य ऊर्जा आणि बालसुलभ कुतूहल दिसते. मला खात्री आहे की, साहस आणि भावनांनी ओतप्रोत असलेली ही कथा बघायला प्रेक्षकांना खूप आवडेल.

# अनन्या वागले कुटुंबात राहायला येते आणि आणि आपल्या पोशाखी जीवनशैलीने गदारोळ माजवते

**मुंबई, २७ मार्च :** सोनी सबवरील वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिकेत मध्यमवर्गीय कुटुंबांचे संघर्ष, त्यांचे यशापयश आणि त्यांच्या जीवनातील हृदयस्पर्शी क्षण यांचे चित्रण बघायला मिळते. या मालिकेच्या अलीकडच्या भागांमध्ये पालकत्व, करकीर्दीविषयीचा संभ्रम आणि किशोरवयातील बंडखोरी या विषयांना हलका-फुलका स्पर्श देऊन हाताळले आहे. कथानकाला आता एक नवीन वळण मिळाले आहे, कारण वागले कुटुंबात एक अनपेक्षित पाहुणी अनन्या (सौम्या शेट्ये) आली आहे.

या आठवड्यात साईदर्शन सोसायटीमध्ये बरीच उलथापालथ होते, जेव्हा अनन्या काही दिवसांसाठी वागले कुटुंबात राहायला येते. अनन्या घरात येते पण, तिची हाय-क्लास जीवनशैली आणि महागड्या सवयी वागले कुटुंबियांच्या साध्या जीवनशैलीशी विसंगत असल्याचे दिसते. कापुचीनो मशीन्सपासून ते सामुदायिक सेलिब्रेशन्सपर्यंत त्यांच्यातील फरक ठळक जाणवतो आणि त्यातून तणाव आणि थोडे हसवणारे हलकेफुलके प्रसंग उद्भवतात. दरम्यान, घराच्या बाहेर एक आणखी मोठी समस्या उभी राहते. अनन्याच्या वडीलांच्या अनन्या स्मार्ट सिटी या नवीन रियल इस्टेट प्रोजेक्टमधील एक इमारत कोसळते आणि अनन्याचे वडील एका विवादात अडकतात.

राजेश वेड्यापिशा झालेल्या मीडियाला सांभाळून आपल्या कुटुंबाच्या गोपनीयतेचे रक्षण करू शकेल का?

राजेश वागलेची भूमिका करणारा अभिनेता सुमित राघवन म्हणतो, या आठवड्याच्या गोष्टीत गैरसमज, भावना आणि प्रत्यक्ष जीवनातील दुविधा दाखवली आहे, जी प्रत्येक कुटुंबात असते. वागलेंच्या घरात अनन्या आल्यामुळे एकच गोंधळ माजला आहे. त्यांच्या जीवनशैलीतील फरकामुळे त्यांच्यात गंमतीशीर चकमकी होतात.


## आज का अंदाज

शुक्रवार २८ मार्च २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ९ | २ | ५ | ६ | ७ |
| ३९० | ४९० | १२३ | १४४ | ११० | ४५६ | १५० | १२४ |
| ४८० | ५८० | २६८ | २७० | २०० | २४९ | २४० | २६९ |
| ५७० | ६७० | ३६७ | ३६० | ३९० | ३५७ | ३३० | ३६८ |
| २० | ३० | ६१ | ९१ | २९ | ५९ | ६० | ७० |
| २७ | ३७ | ६५ | ९५ | २१ | ५१ | ६८ | ७८ |
| २४ | ३४ | ६८ | ९८ | २३ | ५३ | ६४ | ७४ |

२८ मार्च: सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | ४५ | ७० | ८० |
| १९ | ४९ | ७२ | ८२ |
| १३ | ४३ | ७६ | ८६ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** कोणतेही महत्त्वाचे काम पूर्ण होईल. व्यवसायात एखाद्या प्रिय व्यक्तीचे सहकार्य, पाठिंबा मिळेल. नोकरीच्या शोधात तुम्हाला इकडून तिकडे भटकावे लागेल. बाहेरचे पदार्थ खाणं टाळा.

**वृषभ :** आर्थिक स्थिती सुधारेल. व्यवसायातून अधिक धनप्राप्ती झाल्याने मन प्रसन्न राहील. परदेशात स्थायिक झालेल्या प्रिय व्यक्तीकडून तुम्हाला पैसे किंवा मौल्यवान भेटवस्तू मिळतील.

**मिथुन :** राजकारणात महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना त्यांचे पॅकेज वाढवण्याची आनंदाची बातमी मिळेल. कोर्टाच्या कामात यश मिळेल.

**कर्क :** घरात लपवून ठेवलेले पैसे सापडण्याची शक्यता आहे. व्यवसायात उत्पन्न चांगले राहील. अडकलेला पैसा मिळेल. नोकरीत पगारात वाढ होऊ शकते. आज प्रिय व्यक्ती भेटेल. कुटुंबात काही सुखद घटना घडू शकतात.

**सिंह :** आज आरोग्य सुधारेल. गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्यांना सरकारी मदतीमुळे चांगले उपचार मिळतील. हृदयविकाराची भीती व गोंधळ दूर होईल. प्रिय व्यक्तीच्या आरोग्याबाबत काळजी वाटेल.

**कन्या :** नोकरीत तुम्हाला खोट्या आरोपांना सामोरे जावे लागू शकते. अनावश्यक वादविवाद टाळा. आज चैनीच्या वस्तूंवर जास्त पैसा खर्च होईल. नोकरीत वरिष्ठांशी भांडण झाल्यामुळे अधिक उत्पन्न मिळणार नाही.

**तुळ :** वेगवेगळ्या कंपन्या किंवा उद्योगांशी संबंधित त्यांच्या प्रतिनिधींना धावपळ केल्यावरही तुलनेत कमी यश मिळेल. आज कुटुंबात त्रास होईल. तुमचे कडू आणि कठोर शब्दांमुळे इंधन भरण्यासारखे काम करतील.

**वृश्चिक :** आज तुम्हाला नोकरी मिळेल. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. राजकारणात वर्चस्व प्रस्थापित होईल. कला, अभिनय आणि लेखनाशी संबंधित लोकांना उच्च यश मिळेल.

**धनु :** एखादा नातेवाईक तुमच्या घरगुती वादाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करेल. रागावर आणि बोलण्यावरही नियंत्रण ठेवा. मुलांची चिंता वाटत असेल त्या लोकांना चांगली बातमी मिळेल.

**मकर :** आज दिवसाची सुरुवात बरी नसेल. काही महत्त्वाच्या कामात अडथळे येऊ शकतात. घरगुती जीवन सुखकर राहील. चैनीच्या कामांवर पैसा खर्च होईल. कार्यक्षेत्रात व्यस्तता राहील.

**कुंभ :** कर्ज घेऊन जमीन, इमारत, वाहन खरेदीची योजना यशस्वी होईल. बिझनेस ट्रिपमध्ये अपेक्षित नफा न मिळाल्याने तुम्ही दु:खी व्हाल. आज बँकेत जमा होणाजया भांडवलात वाढ होईल.

**मीन :** जुन्या प्रकरणातून दिलासा मिळेल. तुरुंगातून सुटका होईल. तुमच्या चांगल्या कामाची समाजात प्रशंसा होईल. वडिलांकडून आर्थिक मदत मिळेल. कपडे आणि दागिन्यांमध्ये फायदा होईल.

## शब्दकोडे क्रमांक २०६८



**आडवे शब्द :-**

१) अतिशय कृपण, नीच, कृतघ्न माणूस (वा.प्र.)
८) सेवक
१०) रममाण, तल्लीन
११) मजबूत
१३) श्रीविष्णूचे एक नाव
१५) चांदणी
१७) देणारा
१८) तंबाखूचे सुगंधी चूर्ण
२०) विरोध, अडथळा
२२) सरकारी नियम
२४) फिकीर
२५) कच्चे लिखाण (इं.)
२६) लोणच्यातील तेलमसाला
२७) जन्मदाता
२९) लोककथा
३०) पाचवारी लुगडे
३१) सिंह
३२) अभिप्राय
३३) पुष्कळ
३४) लोखंडाला आकर्षित करणारा
३५) श्रीविष्णूचे एक नाव
३६) मरण्याची स्थिती, नाश पावलेला भाग
३८) हिंदीत सर्व
३९) धपाटा
४०) धडधड (हिं.)
४१) भीती
४३) कहाणी
४५) शाश्वत, चिरकाल टिकणारा
४६) शोक, दु:ख (उर्दू)
४८) एकूणएक, सर्व
५०) सत्ताविसावे नक्षत्र
५२) बनारस
५३) पिकांवर पडणारा एक रोग
५४) चित्रपटाचा पडदा
५६) मज्जाव, बंदी
५७) कट्टा
५८) चमक, मुरगळा
५९) लाकूड कापण्याचे हत्यार
६१) आश्रय
६२) मोठा जाड अंगरखा
६३) संपत्ती
६४) खटला
६६) मोठे माकड
६७) द्रव्य, पैसा
६९) लोखंड घासण्याचे हत्यार
७०) वजन
७१) स्त्रीपिशाच्च, हडळ
७२) इंद्राणी
७३जास्तीत जास्त

**उभे शब्द :-**

१) डोके(ग्रा.)
२) वरपांगी
३) पद्धत
४) उल्का पडून तयार झालेले महाराष्ट्रातील एक सरोवर
५) पलंग
६) वहिवाट, जाणे येणे
७) चुका करत करत
९) किरकोळ सामान
१२) गाडीचे छत
१४) मोठे गाव
१५) घाई, त्वरा
१६) चुलता
१७) मोठा भाऊ
१९) पोपट
२१) पैशाशी पैसा जोडणारा, कंजूष
२३) काळपुरुष
२४) सर्वस्व
२६) विशेष
२८) चटकन त्वरित
३०) धैर्य, हिंमत
३१अ) *** ** ** *** तरी लाज राख एक वाकप्रचार
३३) विवाह विच्छेद
३६) मधुमक्षिका
३७) अवघड, कष्टप्रद त्रासदायक
४२) लक्ष्मी
४४) हवा खाण्यासाठी जागेत बदल
४७) चार आठवडे
४९) दहावी रास
५१) धनुष्यबाण
५५) एकाग्र नजर
५६) मत देण्याची क्रिया
५७) मर्यादा
६०) फळातील द्रवपदार्थ
६२) शुष्क, चाबूक
६५) दिवस
६७) पोशिंदा, मालक
६८) कावळा
६९) आजच्या आधीचा दिवस

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# अचलपूरातील रहिवाशांना तीव्र पाणीटंचाईच्या झळा

अन्वरपुरासह अनेक भागांत नागरिकांचे हाल ■ उपाययोजना करण्यात न.प. प्रशासन ढिम्म ■अमृत योजनेचा लाभ नाही







**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर,( दि.27 )** – उन्हाळा सुरू होताच अचलपूरमध्ये पाण्याची समस्या गंभीर बनते. अन्वरपुरासह अनेक भागांमध्ये नागरिक थेंबाथेंबासाठी वणवण फिरत असल्याचे चित्र उन्हाळ्याच्या प्रारंभीच निर्माण झाले आहे. या भागात पाण्यासाठी नागरिकांचे हाल होत असून अद्याप संपूर्ण उन्हाळा शिल्लक असल्याने प्रशासनाने पाणी टंचाईची समस्या सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी या भागातील रहिवाशांकडून करण्यात येत आहे. नागरिकांनी नगर परिषदचे मुख्य अधिकारी धीरज कुमार गोहाड यांना अनेक वेळा निवेदने देवून याबाबत मागणी केली असली तरी कोणतेही ठोस पाउल उचलले न गेल्याने नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

शहरातील अनेक भागांमध्ये केवळ पाईपलाइन जोडण्याचे काम बाकी आहे. परंतु पाणीपुरवठा विभागाकडून याकडे दुर्लक्ष होत आहे. नागरिकांच्या वारंवार तक्रारी असूनही जलपुरवठा विभागाचे अभियंते या भागांमध्ये पाहणी करण्यासही तयार नाहीत. हीरापुरा, अन्वरपुरा, कसदपुरा, फरमानपुरा, बडी संगत, जूना बस स्टँड आणि अकबरी चौक परिसरात पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. मात्र, नगर परिषद या समस्येकडे डोळेझाक करत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. शहरात कोट्यवधी रुपये खर्च करून अमृत योजनेंतर्गत जलपुरवठा सुधारण्याचे उद्दिष्ट होते, मात्र या योजनेचा लाभ अद्याप नागरिकांना मिळालेला नाही. स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की, नगर परिषद प्रशासन जनतेच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करत आहे.

स्थानिक रहिवाशांच्या म्हणण्यानुसार गेल्या एका महिन्यापासून पाण्याची समस्या भेडसावत आहे आणि गेल्या आठ दिवसांपासून नळाला एक थेंबही पाणी आलेले नाही. नागरिकांना लांबवरून पाणी आणावे लागत आहे. या पाणीटंचाईवर लवकरात लवकर उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### आ.प्रवीण तायडे यांच्याकडे मागणी

या गंभीर पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर अचलपूरमधील नागरिकांनी आमदार प्रवीण तायडे यांनी तत्काळ हस्तक्षेप करून समस्या सोडवावी, अशी मागणी केली आहे. अन्वरपुरा येथील रहिवास्यांनी सांगितले की, त्यांच्या भागात अनेक वर्षांपासून पाणीटंचाई आहे. अनेकदा वरिष्ठ अधिकार्यांयकडे तक्रारी केल्या, मात्र आजवर कुठलेही समाधान झालेले नाही.

# भारत मायक्रो फायनान्सच्या कर्मचाऱ्यांकडून महिलांची पिळवणूक

कर्जाच्या वसुलीसाठी अरेरावी | दादागिरीची भाषा वापरुन मानसिक त्रास | नियमबाह्य कारभार करित असल्याचा आरोप



**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा,( दि.27 )** – अचलपूर तालुक्यातील बहुतांश ग्रामीण भागातील महिलांचे गट तयार करून भारत मायक्रो फायनान्स कंपनीचे कर्मचारी त्यांना कर्जाचे वाटप करतात. कर्ज देताना सौजन्याचा देखावा करणार्या या कंपनीच्या कर्मचार्यांकडून वसुली करताना मात्र महिलांची पिळवूणक केली जात असल्याचा आरोप होत आहे. हे कर्मचारी महिलांसोबत अरेरावी करतात. दादागीरीची भाषा वापरुन त्यांना शारीरिक आणि मानसिक त्रास देतात, असे महिलांनी सांगितले. भारत मायक्रो फायनान्स कंपनीकडून नियमबाह्य पद्धतीने कारभार केला जात असून या कंपनीची सत्यताच तपासण्याची गरज असल्यो बोलले जात आहे.

भारत मायक्रो फायनान्स कंपनीकडून पाच-पाच महिलांचा एक एक गट बनवून कर्जाचे वाटप केले जाते. फक्त महिलांसाठी मर्यादित असे या कंपनीचे कर्जवाटप धोरण आहे. आठवड्यातील एका दिवशी कोणत्याही गटातील एका महिलेच्या घरी जाऊन बैठक घेउन कर्जाची वसुली केली जाते.

परंतु त्यामध्ये गटातील एका महिलेने कर्जाची रक्कम त्यावेळी, त्यादिवशी भरणा न केल्यास इतर सर्व महिलांना कंपनीचे कर्मचारी उलटसुलट नियम सांगून वेठीस धरतात व तुम्हीच त्या महिलेच्या घरी जाऊन पैसे वसूल करून आणा नाहीतर तुम्हाला आम्ही इथेच बसवून ठेवणार असे सांगून त्यांची पिळवणूक करतात, हे गैरकायदेशीर असल्याचे बोलले जात आहे.

आम्ही त्या महिलेला कर्ज दीले नाही तर सर्व गट मिळून दिले आहे, आता त्याच्या वसुलीची जबाबदारी तुमची आहे, असे सांगितले जाते. दादागिरीची भाषा वापरून काही कर्मचारी महिलांसोबत आक्षेपार्ह वर्तुणूक करतात. काही कर्मचार्यांनी तर महिलांच्या अंगावर धावून जाण्याचा प्रकारही केला असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

### धमकी देत शिवराळ भाषेचा वापर

आरोप आहे की, हे कर्मचारी त्यांना कंपनीने दिलेले वसुलीचे टार्गेट पुर्ण करण्यासाठी काही महिलांना जबरदस्तीने कर्जाचे वाटप करतात व त्या महिलेने कर्जाचे हप्ते थकवले तरीही बाकी गटातील महिलांना त्यांच्या कर्जाची परतफेड करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या धमक्या देऊन वेठीस धरतात. अशा बेकायदेशीरपणे, धमकावून व शिवराळ भाषा वापरून कर्जवसुली करणार्या कर्मचार्यांववर कठोर कारवाई करुन त्यांना धडा शिकवावा आणि महिलांचे आर्थिक व मानसिक शोषण थांबवावे अशी तक्रार वरिष्ठ पातळीवर करण्यासाठी गौरखेडा कुंभी येथील महिला आता सरसावल्या आहेत. गुरूवारी गौरखेडा कुंभी येथील एका महिलेच्या घरी कर्जवसुलीसाठी झालेल्या बैठकीमध्ये भारत मायक्रो फायनान्स कंपनीच्या एका कर्मचार्याने तेथील काही महिलांना गलिच्छ भाषा वापरून वेठीस धरले. याबाबत गावातील महिला आता वरिष्ठ पातळीवर तक्रार दाखल करणार असल्याचे समजते.

# यात्रेच्या तोंडावरच सावंगा विठोबाच्या रस्त्यांची दुर्दशा

**प्रशासनाकडून दिरंगाई, पुढाऱ्यांचेही दुर्लक्ष**

**भाविकांमध्ये तीव्र असंतोष**



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, ( दि.27 )**- संपूर्ण महाराष्टात कापुराची यात्रा म्हणून प्रसिद्ध असलेले सावंगा विठोबा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही गुढीपाडवा-रामनवमी यात्रा महोत्सवाला प्रारंभ होत असतानाच या गावापर्यंत जाणार्या रस्त्यांची मात्र प्रचंड दुर्दशा झाली असून त्याचा प्रचंड त्रास यात्रेकरिता लाखोंच्या संख्येने येणार्या भाविक-भक्तांना सहन करावा लागणार आहे. वारंवार मागणी करुनही प्रशासनाने रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत दिरंगाईचे धोरण अवलंबीले आणि परिसरातील जनप्रतिनिधींनीही लक्ष दिले नाही. त्यामुळे भाविकांमध्ये प्रशासन व जनप्रतिनिधींप्रती तीव्र असंतोष व्यक्त केला जात आहे.

महाराष्टच नव्हे तर गुजरात, मध्य प्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक, दिल्ली, छत्तीसगड, उत्तर प्रदेश येथून या यात्रेत 3 ते 4 लाख भाविक हजेरी लावतात. वर्षभरात येथे 15 ते 16 लाख भाविक दर्शनासाठी येत असतात. सावंगा विठोबा येथे पोहचणारे सर्वच रस्ते अत्यंत वर्दळीचे असून या रस्त्यांची अवस्था सध्या अत्यंत दयनीय झाली आहे. रस्ते ठिकठिकाणी उखडले असून मोठाले खड्डे पडले आहे. गर्दी बघता या मार्गावर अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. यात्रेआधी या रस्त्यांचे नुतणीकरण करणे आवश्यक होते. पण प्रशासनाने यंदा साधी रस्त्यांची दुरुस्तीदेखील केली नाही.

रस्त्यावर अवजड वाहनांची वाहतूक वाढल्याने रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय झाली. काही ठिकाणी रस्त्यावरील गिट्टी उघडी पडलेली आहे. तसेच गावाशेजारी असलेल्या खोलाड नदीवरच्या पूलावरचा कठडाही तुटलेला आहे. तसेच नाल्यावरील नवीन पुलाचे काम अपूर्णावस्थेत आहे. त्यामुळे येथे वाहतुकीचा खोळंबा होण्याची व अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे.

रस्त्याचे काम करताना मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याचा गावकर्यांचा आरोप आहे. रस्ता बांधताना डांबर कमी आणी चुरा जास्त वापरला जातो. त्यामुळे हे रस्ते फार काळ टिकत नाही. पावसाळ्यात पाण्यात वाहुन जातात. अवजड वाहनांमुळे रस्ते उखडले असून त्यावर खड्डे पडले आहेत. वारंवार असे घडत असतानाही, प्रशासनाकडून कोणतीही कारवाई होत नाही. कंत्राटदार आणि प्रशासनातील संबंधित अधिकार्यांतच्या संगणमतातूनच हा गैरप्रकार केला जात असल्याची ओरड आहे.

### लाखो रुपयांचा खर्च, दुरुस्ती मात्र थातुर-मातुर

दरवर्षी या रस्त्याच्या दुरुस्तीवर लाखो रुपये खर्च केले जातात. हा संपूर्ण खर्च वाया जात आहे. यंदातर रस्त्यांची साधी दुरुस्तीही करण्याची गरज प्रशासनाला वाटली नाही. अमरावती-चांदुर रेल्वे या रस्त्यावर पोहरा लगत असलेल्या सावंगा विठोबा फाट्यापासून हा रस्ता पूर्ण उखडलेला आहे. तसेच मांजरखेड कसबा ते सावंगा विठोबा तसेच मालखेड ते सावंगा विठोबा हे सर्वच रस्ते खराब झाल्याने यंदा यात्रेत येणार्यास भाविकांना मनस्ताप सहन करावा लागणार आहे. या भागातील अनेक गावांतील नियमित ये-जा करणारे विद्यार्थी, शेतकरी तर रस्त्यांच्या दुर्दशेमुळे पूर्णतः त्रासले आहेत. या रस्त्यांनी शेतमालाची वाहतूक होते. व्यापारी दृष्टीकोनातुनही रस्ता महत्वाचा असताना रस्त्याच्या कामाकडे पाठ फिरविली जात असल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे.



# नायब तहसीलदारांनी केली पाणंद रस्त्यांची पाहणी

**कामे तात्काळ पूर्ण करा**

**शेतकऱ्यांहची मागणी**

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि.27 )**-अंजनगाव बारी परिसरातील पांदन रस्त्यांची नायब तहसिलदार टिना चव्हाण यांनी नुकतीच पाहणी केली. अंजनगाव बारी ते निंबोरा, अंजनगाव बारी ते जळू, धनगवळी देवस्थान-होलाणी पाणंद रस्ता, अंजनगाव बारी ते निदानजी महाराज देवस्थान रस्ता या पाणंद रस्त्यांचे खडीकरणासह अन्य कामे पुर्णत्वास गेली आहेत. या रस्त्यांच्या कामाचा प्रत्यक्ष पाहणी करुन आढावा घेतल्यानंतर टिना चव्हाण यांनी राहीलेली कामे तात्काळ पूर्ण करु असे शेतकर्यांथना सांगितले.

परिसरातील ज्या पांदन रस्त्यांची कामे अपूर्ण आहेत, ती तात्काळ पूर्ण करण्याची मागणी शेतकर्या्नी केली. काही पाणंद रस्त्यांची कामे शेतकर्यांनच्या आडमुठ्या धोरणामुळे अडकली आहेत. अशा कामात कायदेशीर अडचणी निर्माण करणार्याा शेतकर्यांयवर योग्य ती कारवाई करून राहिलेल्या पाणंद रस्त्यांची कामे पुर्ण करण्याचे आश्वासन त्यांनी शेतकर्यांडना दिले. यावेळी ग्राम महसूल अधिकारी विजय देशमुख तसेच दिलीप निचत, सुभाष निचत, प्रितेश सुने, संदिप डकरे, दिंगाबर पोकळे, महेश मुळे, अनिल मुळे, राजेंद्र मुळे, अंकुश दातीर, प्रकाश दातीर, विक्की गुर्जर, गुलाब यमगर, प्रमोद निचत, विनोद निचत, नरेंद्र निचत, नामदेव राठोड, निखिल राठोड, विरेंद्र पुने, किशोर पुणे, बाळू निचत, दादाराव पोकळे, सुनिल दातीर, धन्या यमगर, अमोल तलवारे, राजू तलवारे, शंकर नवखरे, चेतन नवखरे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

# प्रेम बेहरे नवोदय विद्यालयासाठी पात्र

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.27 )**- तालुक्यातील नेर पिंगळाई येथील विद्यानिकेतन इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी प्रेम प्रमोदराव बेहरे याने जवाहर नवोदय परीक्षेत यश प्राप्त केले असून त्याची नवोदय विद्यालयासाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल प्रेम बेहरे याचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्याने यशाचे श्रेय विद्यानिकेतन इंग्लिश कॉन्व्हेंट मधील सर्व शिक्षकवृंद, तसेच त्याचे पालक यांना दिले आहे. प्रेम बेहेरे याचे यशाबद्दल शाळा संचालिका सोनाली गजानन नवले, मुख्याध्यापिका नितु तट्टे, वर्गशिक्षक सिद्धांत दाभेकर, रुक्मिनी निम्बेकर, निकिता संभे, काजल क्षिरसागर, श्रद्धा पांडे, अनुराधा मोरस्कर, स्वाती तायडे, निखिल माकोडे, अशनीया मेहेक, मयुरी बुरंगे, स्नेहा बर्डे, संगीता गिर्हे, शितल काकस, अमृता डेहनकर, अश्विनी राऊत, शिक्षकेत्तर कर्मचारी शिला उपरीकर व सुवर्णा पातूरकर यांनी अभिनंदन केले आहे.



# तरुणाजवळील पावणेतीन लाखांची रोकड हिसकाविली


**अमरावती**- दुचाकीवरून आलेल्या चार जणांनी एका तरुणाजवळील पावणेतीन लाखांची रोख असलेली बॅग हिसकावून पळ काढला. ही घटना 27 मार्च रोजी सायंकाळी 7 वाजताच्या सुमारास कोतवाली ठाण्याच्या हद्दीतील जयस्तंभ चौक परिसरातील एका चित्रपटगृहासमोर घडली. राजकमल चौक परिसरात आकाश आनंदानी यांचे मोबाइलचे दुकान आहे. या दुकानात मंगेश वासुदेवराव काळे (26, रा. गोपालनगर, अमरावती) हा काम करतो. मंगेश हा गुरुवारी सायंकाळी आकाश आनंदानी यांच्या घरून रोकड घेऊन दुकानात जात होता. मार्गात काही कामानिमित्त तो जयस्तंभ चौक परिसरातील एका चित्रपट गृहाजवळ थांबला. त्याचवेळी दुचाकीवरून आलेल्या चार लुटारूंनी मंगेशकडील 2 लाख 75 हजारांची रोकड असलेल्या बॅगवर झडप मारली. काही कळण्यापूर्वी लुटारू तेथून पसार झाले. सदर घटनेनंतर मंगेशने कोतवाली ठाणे गाठून तक्रार दाखल केली. तक्रारीवरून अज्ञात लुटारूंविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांचा शोध सुरू आहे.

# आरडीआयके व केडी महाविद्यालयात पालक सभा

**बडनेरा** – बडनेरा येथील युथ वेलफेअर सोसायटीद्वारा संचालित बॅरि. आरडीआयके व केडी महाविद्यालयात अकरावी व बारावी वर्गासाठी पालक सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. देशमुख होते. यावेळी पालक समिती सदस्य साखरकर, सपाटे यांनी आपले विचार व्यक्त केले. प्राचार्यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक सुविधांबद्दलची व विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे उपक्रम राबवितात त्याची माहिती पालकांना दिली. प्रास्ताविक प्रा. गौरव काकडे, कार्यक्रमाचे संचालन प्रा. मळसणे व आभार प्रदर्शन प्रा. भारती ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# कागदी कपातून चहा पिण्याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम

**कॅन्सरच्या चर्चेनंतर गोंधळ**



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.27 )** – कागदी कपातून चहा किंवा कॉफीचे सेवन केल्यामुळे कॅन्सर होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. याबाबतची नेमकी वस्तुस्थिती आरोग्य विभागाने स्पष्ट करण्याची गरज आहे. मात्र आरोग्य विभागाने कुठलेही निवेदन यासंदर्भात प्रसारित केले नसल्याने कागदी कपातून चहा पिण्याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम व गोंधळाची स्थिती कायम आहे.

चिनी मातीचे कप किंवा काचेचे ग्लास विसळणे ते फुटण्याची शक्यता तसेच हातातून दुसरीकडे नेण्यासाठी गैरसोयीचे असते. यामुळे गेल्या काही वर्षांमध्ये कागदी कपातून चहा, कॉफीची विक्री करणे सर्रास सुरू आहे. एसटी बसस्थानक, रेल्वेस्थानकावर तसेच गाड्यांमध्ये आणि शहरात व गावखेड्यात विविध ठिकाणी कागदी कपातूनच चहा, कॉफी दिली जाते. परंतु याबाबत आता वेगळीच माहिती समोर येत आहे. हे कप बनवताना त्यामध्ये प्लास्टिक आणि बिस्फेनॉल ए नामक अत्यंत घातक रसायनांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करून हे डिस्पोजेबल कब तयार करण्यात येतात. या कपात गरम चहा, कॉफी, पाणी टाकल्यास कपाच्या आतील मायक्रो प्लास्टिक वितळते चहा कॉफी घेतल्याने मायक्रो प्लास्टिकचे कण पोटात जातात, ज्यामुळे कॅन्सर होण्याची शक्यता असते, अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरु आहे.

जर हे खरे असेल तर सार्वजनिक आरोग्य विभागाने याबाबत खुलासा करून बंदी घालावी, अशी मागणी आहे अनेक छोट्या खानावळीत आणि हॉटेल्स मधून ही प्लास्टिक पिशव्यातून गरम आमटी सांबार दिला जातो. गरमागरम आमटी सांभारमुळे या पिशव्यांचे प्लास्टिकही वितळते का आणि तेही आरोग्याला घातक ठरते का याचाही खुलासा होण्याची गरज आहे. त्यामुळे तालुक्यातील नव्हे तर जिल्ह्यातील आरोग्य विभागाने याची खबरदारी नाही काळजी घ्यावी, अशी मागणी आता सर्वसामान्य जनतेतून केल्या जात आहे. आता या प्रकरणाची गंभीर दखल तालुका व जिल्हा आरोग्य विभाग घेईल का घेईल का याकडे मात्र सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागलेले आहेत.


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे प्रशांत भाऊराव निस्ताने यांचे वतीने सादर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

मिळकतीचे वर्णन : मौजे कुहा, नझूल प्लॉट क्रं. 872, नझूल शीट क्र. 4, ता. तिवसा जिल्हा अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे प्रशांत भाऊराव निस्ताने. यांच्या मालकीचे आहे तदनंतर, त्यांनी VASTU HOUSING FINANCE CORPORATION LTD. येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ हक्कसोडपत्र खत दि. 11/01/2019 रोजीचे दस्त क्र. 89 सदर मुळ हक्कसोडपत्र गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान, पतसंस्था/राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल नं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 3 दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही हि विनंती.

शिक्का

आपला
ADVOCATE
रवींद्र रू. वाटाणे
स्नेहगंधा कॉलोनी,अमरावती
मो. नं. 9823698745

# अस्मिता

# सीसीडीची तारणहार

मानिनी


कॅफे कॉफी डे (सीसीडी) ही एकेकाळी भारतातील सर्वात लोकप्रिय कॉफी चेन होती, परंतु २०१९ मध्ये कंपनी ७,००० कोटी रुपयांच्या कर्जाखाली असताना संस्थापक व्ही.जी. सिद्धार्थ यांनी आत्महत्या केली आणि परिस्थिती बिकट बनली. मात्र त्यांच्या निधनानंतर पत्नी मालविका हेगडे यांनी 'कॅफे कॉफी डे' ला दिवाळखोरीपासून वाचवण्याची जबाबदारी घेतली आणि ही चेन पुन्हा एकदा नव्या दमाने जगासमोर आणली. आज या मानिनीची अर्थातच मालविका हेगडे यांच्या संघर्षाची आणि धाडसाची संपूर्ण कहाणी जाणून घेऊ या.

व्ही.जी. सिद्धार्थ यांनी १९९६ मध्ये सीसीडीची स्थापना केली होती. ही कंपनी २००० पर्यंत प्रचंड नफा कमवत होती. मात्र २०१५ पासून कंपनीचे वाईट दिवस सुरू झाले. बघता बघता २०१९ पर्यंत कंपनीवर ६,५४७ कोटी रुपयांचे कर्ज झाले. खचल्यामुळे तसेच कर्ज आणि आयकरामुळे अडचणीत सापडलेल्या विजय सिद्धार्थ २०१९ मध्ये नदीत उडी मारून आत्महत्या केली. तेव्हाच सात हजार कोटी रुपयांच्या कर्जात बुडालेल्या आणि २५ हजार कर्मचारी असणाऱ्या कंपनीची जबाबदारी मालविका हेगडे यांच्यावर आली. खरे पाहता त्यांना उद्योगात फारसा अनुभवही नव्हता. मात्र असे असतानाही त्यांनी अत्यंत परिश्रमाने आणि तारतम्य राखून कंपनीला वाईट आर्थिक बिकट परिस्थितीतून बाहेर काढले. त्या 'कॅफे कॉफी डे एंटरप्रायझेस लिमिटेड' च्या सीईओ झाल्या आणि पुन्हा यशाच्या मार्गावर आणण्याचा प्रयत्न यशस्वी करून दाखवला.

या प्रयत्नात त्यांनी सर्वप्रथम कंपनीतील अनावश्यक खर्च थांबवून, व्यवसायाची पुनर्रचना करून आणि योग्य आर्थिक नियोजन करून सीसीडीचे कर्ज ७,००० कोटी रुपयांवरून १,८०० कोटी रुपयांपर्यंत कमी केले. खेरीज सीसीडीला एक स्थिर आणि मजबूत ब्रँड बनवण्यासाठी त्यांनी ग्राहककेंद्रित धोरण स्वीकारले. त्यांनी बँका, गुंतवणूकदार आणि कर्मचाऱ्यांचा विश्वास कायम ठेवल्यामुळे दिवाळखोरी टळू शकली. आक्रमक विस्तार करण्याऐवजी सीसीडीने विद्यमान स्टोअर्स सुधारण्यावर आणि फायदेशीर शाखा उघडण्यावर लक्ष केंद्रित केले. मालविका यांनी हजारो सीसीडी कर्मचाऱ्यांना प्रेरणा दिली आणि कंपनीमध्ये आशा आणि विश्वास कायम ठेवला.

याचाच परिणाम म्हणून आज सीसीडी पुन्हा एकदा एक मोठा ब्रँड बनला आहे. मालविका हेगडे यांच्या खंबीर नेतृत्वाने त्याने राखेतून भरारी घेण्याची कमाल करून दाखवली आहे. मालविका यांचा संघर्ष आणि नेतृत्वक्षमता समाजातील अनेक महिलांसाठी प्रेरणा म्हणावी लागेल कारण हे गुण असतील तर महिला कोणत्याही अडचणीवर मात करू शकते, हे त्यांनी सोदाहरण दाखवून दिले आहे. शेवटी कठीण काळातही धैर्य आणि योग्य रणनीतीने यश मिळवता येते हेच मालविका हेगडे यांची ही कहाणी आपल्याला सांगते. मालविका कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एस.एम. कृष्णा यांची मुलगी आहेत. या यशाने त्यांनी आपल्याबरोबरच आपल्या कुटुंबाची समाजातील मान आणि पत उंचावली आहे, यात शंका नाही.





# फॅशन नव्हे, हे तर प्रतीक

कारण की...

वकील नेहमी काळे कोट आणि डॉक्टर पांढरे कोट का घालतात? हे तुम्ही जाणता का? काळा रंग नेहमीच गांभीर्य, शक्ती आणि आदराचे प्रतीक मानला जातो. म्हणूनच वकील त्यांच्या व्यावसायिक जीवनात काळा कोट वापरतात. याव्यतिरिक्त काळा रंग न्याय, निष्पक्षता आणि गांभीर्य यांच्याशी संबंधित आहे. त्यामुळेच वकील काळ्या कोटात कोर्ट रूममध्ये प्रवेश करतात तेव्हा ते त्यांच्या खटल्यांमध्ये गांभीर्य आणि प्रामाणिकपणाची भावना दर्शवत असल्याचे मानले जाते. काळ्या रंगावर कोणतेही डाग सहज दिसत नाहीत. यामुळे वकील नेहमीच व्यावसायिक दिसतात. एक प्रकारे, हा रंग त्यांना वैयक्तिक आणि व्यावसायिक प्रतिमा टिकवून ठेवण्यास मदत करतो.

आता डॉक्टरांच्या पांढऱ्या कोटबद्दल जाणून घेऊ या. पांढरा रंग नेहमीच पावित्र्य, स्वच्छता आणि श्रद्धेचे प्रतीक मानला जातो. १९ व्या शतकाच्या मध्यात, वैद्यकीय शास्त्राचा झपाट्याने विकास झाला आणि रुग्णालयांमध्ये स्वच्छतेकडे लक्ष दिले जाऊ लागले, तेव्हा डॉक्टरांनी पांढरे कोट घालायला सुरुवात केली. पांढऱ्या रंगावर डाग सहज दिसत असल्यामुळे डॉक्टर स्वच्छता आणि स्वच्छतेबद्दल जागरूक असल्याचे या रंगाचा कोट घालवून दर्शवतात.

पांढऱ्या कोटचे दुसरे मोठे कारण म्हणजे विश्वास. एखादा रुग्ण पांढरा कोट घातलेल्या डॉक्टरकडे जातो तेव्हा त्याला ही व्यक्ती योग्य उपचार देऊ शकेल याची खात्री पटते. पांढऱ्या रंगाच्या प्रभावामुळे इतका रुग्णांना मानसिक शांती आणि सुरक्षितता जाणवते. पांढऱ्या रंगाचा आणखी एक पैलू म्हणजे तो आरोग्य आणि शुद्धतेचेही प्रतीक आहे. रुग्णालये आणि दवाखान्यांमध्ये स्वच्छता खूप महत्त्वाची आहे. हे लक्षात घेऊन तेथील आरोग्यतज्ज्ञ पांढरे कोट वापरतात. याव्यतिरिक्त, पांढरा कोट परिधान केल्याने डॉक्टर व्यावसायिक आणि विश्वासार्ह दिसतात. स्वाभाविकच रुग्णांचा विश्वास जिंकण्यास मदत होते. म्हणजेच वकिलांचा काळा आणि डॉक्टरांचा पांढरा कोट हे केवळ फॅशन किंवा पारंपरिक पोशाख नाहीत, तर ते परिधान करण्यामागे सखोल विचार आणि उद्देश आहे, हे लक्षात घ्यायला हवे.



# टेस्टी मेक्सिकन सँडविच

रुचिरा

सँडविचचे अनेकविध प्रकार आहेत. चीज, ग्रील, क्लब ही सँडविच तुम्ही खाल्ली असतील. तुम्हाला सँडविच आवडत असेल तर मेक्सिकन सँडविच करायला हरकत नाही.

**साहित्य:** दहा ब्रेड स्लाईस, तीन टेबलस्पून बटर, अर्धा कप चीज, कांदा, बटाटा आणि टोमॅटो प्रत्येकी एक, दोन-तीन हिरव्या मिरच्या, एक कप स्वीट कॉर्न, टोमॅटो सॉस, चिली सॉस, एक कप व्हाईट सॉस, मिरपूड आणि मीठ

**कृती:** बटाटा आणि स्वीट कॉर्न उकडून घ्या. चीज किसून घ्या. कांदा, टोमॅटो आणि हिरवी मिरची बारीक चिरून घ्या. एका भांड्यात स्वीट कॉर्न, बटाटा-कांदा, टोमॅटो, हिरवी मिरची, थोडं चीज, व्हाईट सॉस, चवीनुसार मिरपूड आणि मीठ घाला. सगळं मिश्रण नीट मिसळून घ्या. बटाटा थोडा कुस्करून घ्या. ब्रेड स्लाईस टोस्ट करून घ्या. प्रत्येक ब्रेड्या एका बाजूला बटर लावा. त्यापैकी पाच ब्रेड स्लाईसवर भाजीचं मिश्रण पसरवून घ्या. त्यावर उरलेलं चीज भुरभुरा. वरून थोडा टोमॅटो आणि चिली सॉस घाला. मग ब्रेड स्लाईस ठेवा. मायक्रोवेव्ह प्री हिट करून घ्या. यानंतर कन्वेक्शन मोडवर १६० अंश तापमानावर चीझ वितळेपर्यंत बेक करून घ्या. गरमागरम खा.

# धोका नाही, काळजी नको

अॅल्युमिनियम फॉइलमध्ये अन्न ठेवणे आरोग्यासाठी हानिकारक असते हे आपण जाणतो. विशेषतः गरम किंवा आम्लयुक्त अन्न फॉइलमध्ये गुंडाळल्याने अॅल्युमिनियमचे कण अन्नात मिसळून शारीरिक हानी घडवून आणू शकतात. तथापि, अॅल्युमिनियम इतके धोकादायक असेल तर ते औषधांच्या पॅकेजिंगमध्ये का वापरले जाते, याचा कधी विचार केला आहे का? मैत्रिणींनो, गरम आणि आम्लयुक्त घटक ठेवण्यासाठी अॅल्युमिनियम फॉइल अयोग्य असली तरी ओलावा, ऑक्सिजन, प्रकाश आणि बॅक्टेरियापासून औषधांचे संरक्षण करण्यासाठी मात्र अॅल्युमिनियम फॉइल हा सर्वात सुरक्षित मार्ग आहे. औषधे प्लास्टिक किंवा इतर कोणत्याही साहित्यात पॅक केली तर ती लवकर खराब होऊ शकतात. महत्त्वाची बाब म्हणजे औषधांच्या पॅकेजिंगमध्ये वापरला



जाणारी अॅल्युमिनियम फॉइल औषधाच्या थेट संपर्कात येत नाही कारण टॅब्लेट किंवा कॅप्सूलवर आधीच संरक्षक आवरण असते. त्यामुळे औषधांवाटे अॅल्युमिनियम फॉइलमधील हानिकारक कण शरीरात पोहोचण्याचा धोका राहात नाही. औषधांच्या पॅकिंगमध्ये अॅल्युमिनियम फॉइलचा वापर 'एफडीए' (अन्न आणि औषध प्रशासन) आणि 'डब्ल्यूएचओ' (जागतिक आरोग्य संघटना) सारख्या संस्थांनी पूर्णपणे सुरक्षित मानला आहे. त्यामुळेही ही बाब काळजीची उरत नाही.

जाणून घ्या

हे लक्षात घेता अॅल्युमिनियम फॉइलचा योग्य वापर करण्याचे धोरण आखणे गरजेचे आहे, हे लक्षात घ्यावे लागेल. जसे की, जास्त काळ अॅल्युमिनियम फॉइलमध्ये गरम किंवा आम्लयुक्त पदार्थ ठेवू नका. फॉइल वापरत असाल तर विशिष्ट तापमानासाठी डिझाइन केलेली अॅल्युमिनियम फॉइल वापरा. औषधे फॉइलच्या थेट संपर्कात येत नसल्यामुळे कोणताही धोका नाही, त्यामुळे निश्चिंत राहा.

# मिळवा मॅट लूक

सौंदर्यसाधना

लिपस्टिकमुळे चेहऱ्याचं सौंदर्य खुलतं. लिपस्टिक लावल्यानंतर तुम्ही सुंदर दिसू लागता. सध्या बऱ्याचजणी मॅट लिपस्टिक वापरतात. मॅट लिपस्टिक बराच काळ टिकून रहाते. या लिपस्टिक ग्लॉसी लिपस्टिकच्या तुलनेत थोड्या महाग असतात. तुमच्याकडे ग्लॉसी लिपस्टिक्स असतील तर त्यांना मॅट लूक देता येईल. काही ट्रिक्सनी तुम्ही मॅट लूक मिळवू शकता.

* ओठांवर ग्लॉसी लिपस्टिक लावा. टिश्यू पेपर घ्या. त्यावर थोडी ट्रांस्लुसेंट पावडर घाला. आता ही पावडर हलक्या हातांनी ओठांवर लावा. ट्रांस्लुसेंट पावडरमुळे तुमच्या ग्लॉसी लिपस्टिकला मॅट लूक मिळेल आणि ती बराच काळ टिकून राहिल.
* ग्लॉसी लिपस्टिक लावल्यानंतर एक टिश्यू पेपर घ्या. हलक्या हातांनी ओठांवर फिरवा. ग्लॉसी लिपस्टिकची चमक टिश्यू पेपरमुळे शोषली जाईल आणि तुम्हाला मॅट लूक मिळेल.
* मॅट लूक मिळवण्याची आणखी एक पद्धत म्हणजे ग्लॉसी लिपस्टिक लावल्यानंतर थोडी ट्रांस्लुसेंट पावडर बोटांवर घेऊन हलक्या हातांनी ओठांवर लावा. टिश्यूने जास्तीची पावडर काढून टाका. पावडरमुळे ग्लॉसी लिप कलर शोषला जाईल आणि ओठांना मॅट लूक मिळेल.




# बाल्कनीतील बाग

करून पाहा

अनेकजणींना बागकामाची आवड असते. छंद म्हणून घराच्या बाल्कनीत बाग फुलवली जाते. अनेक घरांमध्ये सोयीसाठी पुदीना, कढीपत्ता, कोथिंबीर लावली जाते. तुळसही असतेच. यासोबतच स्वयंपाकघरात वापरल्या जाणाऱ्या इतर काही वनस्पतींची लागवड करून चांगलं उत्पन्न मिळवता येईल. याबाबतच्या काही टिप्स...

* पुदीना, कोथिंबीर, कढीपत्ता यांचं पीक मोठ्या प्रमाणावर घेणं शक्य असेल तर त्यांची विक्री करता येईल. कढीपत्ता, पुदीना वाळवूनही विकता येईल. कोथिंबिर, पुदीना, कढीपत्ता तसंच इतर काही भाज्या ताज्याही विकता येतील. यासाठी आकर्षक पॅकिंग तयार करा. त्यासोबत गार्डनिंग टिप्स द्या. थोड्या अनुभवानंतर तुम्ही स्वतःचा ब्रँडही सुरू करू शकता.
* आजकाल विविध प्रकारचे हर्ब्ज वापरले जातात. त्यांचीही लागवड करता येईल. यात लेमन ग्रास, पार्सेली, ओरिगॅनो असे पर्याय आहेत. तुम्ही मिरच्यांची लागवडही करू शकता.
* घरातल्या बागेत विविध प्रकारच्या फुलांची रोपटी असतील तर त्यांची विक्री करता येईल. तुम्ही फुलांचा बुके तयार करण्याचा किंवा फुलांच्या सजावटीचं प्रशिक्षण घेऊन चांगला व्यवसाय सुरू करू शकता.
* घरात मोठी गच्ची असेल तर भाज्यांची लागवड करता येईल. टोमॅटो, फरसबी, वांगी, सिमला मिरची, कांद्याची पात, लेट्यूस, मुळा यांची लागवड करता येईल. सध्या नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्या भाज्यांना बरीच मागणी आहे. तुम्हीही नैसर्गिक खतांचा वापर करून भाज्यांची लागवड करा. चांगलं उत्पन्न मिळेल.



## जाणून घ्या — पेय नव्हे, हे तर सनस्क्रीन

पिण्यायोग्य सनस्क्रीन ही नवी संकल्पना तुम्हाला माहिती आहे का? हो, सध्या या अनोख्या सनस्क्रीनची चर्चा आहे. पूरक आणि पोषक घटकांनी युक्त असणारे हे पेय प्यायल्यानंतर त्वचेचे अतिनील किरणांपासून संरक्षण होते. त्यात काही विशिष्ट अँटीऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि नैसर्गिक घटक असतात जे त्वचेच्या अंतर्गत पातळीवर काम करून सूर्यापासून संरक्षण देतात. हे पेय प्यायल्याने शरीरात काही घटक सक्रिय होतात, जे त्वचेसाठी नैसर्गिक संरक्षण कवच तयार करतात. विशेष म्हणजे हे पेय प्यायल्यानंतर उन्हात जाताना सनस्क्रीन लावण्याची गरज राहात नाही, कारण त्वचा स्वतःच अतिनील किरणांशी लढण्यास सक्षम होते. या पेयातील अँटीऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन सी, ई सारखे घटक त्वचेला ऑक्सिडेटिव्ह तणावापासून वाचवतात. यामुळे सनबर्न आणि वृद्धत्वाची समस्याही कमी होऊ शकते.



## गिफ्टिंग — भेटवस्तू निवडताना...

एखाद्या सौंदर्यप्रेमी मैत्रिणीला भेटवस्तू द्यायची असेल तर ती निवडताना वैयक्तिक आवडी आणि सौंदर्य दिनचर्येशी जुळती असल्याची खात्री करा. स्किनकेअर, मेकअप, परफ्यूम वा यासारखी कोणतीही भेट तिच्या चेहऱ्यावर हास्य आणेल हे निश्चित. स्किनकेअरची आवड असेल तर प्रीमियम स्किनकेअर सेट भेट देणे चांगले. यात मॉइश्चरायझर, सीरम, फेस मास्क, क्लीन्सर आणि आवश्यक तेले असतात. अर्थातच याच्या वापरामुळे त्वचा चमकदार होते. अशावेळी तुम्ही तिला स्पा व्हाउचर किंवा ब्युटी ट्रीटमेंटचे पॅकेजही भेट देऊ शकता. यामुळे तिला ताजेतवाने वाटेल.




## स्किन केअर — त्वचेसाठीही नारळाचे तेल

आपण नारळाच्या तेलाच्या फायद्यांविषयी जाणतो. परंतु केवळ केसांसाठीच नव्हे तर त्वचेसाठी देखील नारळाचे तेल खूप फायदेशीर आहे, हे लक्षात घ्या. विशेषतः त्वचा कोरडी असेल तर या तेलाचा अवश्य वापर करावा कारण नारळाचे तेल त्वचेला ओलावा आणि मऊपणा देण्यास मदत करतो. रात्री चेहऱ्यावर नारळाचे तेल लावण्याचे बरेच फायदे आहेत. जसे की, नारळाचे तेल त्वचेला खोलवर मॉइश्चराइज करते. हे त्वचेला कोरडी आणि खडबडीत होण्यापासून रोखते. त्वचेत शोषले जात असल्यामुळे रात्रभर ओलावा टिकवून ठेवते. म्हणूनच सकाळी उठल्यावर त्वचा मऊ आणि हायड्रेटेड वाटते.



# २१ हजार शिवप्रेमींनी घेतले ऐतिहासिक वाघनखांचे दर्शन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

नागपूर येथील मध्यवर्ती संग्रहालयात छत्रपती शिवाजी महाराजांची ऐतिहासिक वाघनखे प्रदर्शित करण्यात आली आहेत. ८ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

मध्यवर्ती संग्रहालयाचे अभिरक्षक मयूर खडके यांच्या माहितीनुसार, फेब्रुवारीच्या २० दिवसांत सुमारे २१ हजार नागरिकांनी वाघनखे पाहिली. मार्च महिन्यात उन्हाळा आणि शाळांच्या परीक्षांमुळे केवळ ४ ते ५ हजार शिवप्रेमींनी भेट दिली.

ही वाघनखे लंडनच्या व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियममधून महाराष्ट्रात आणण्यात आली आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतापगडावर अफजलखानाचा वध करताना याच वाघनखांचा वापर केला होता.

पुरातत्व विभाग आणि राज्य सरकारच्या वेळापत्रकानुसार, सात महिने साताऱ्यात प्रदर्शित केल्यानंतर आता ही वाघनखे २ सप्टेंबर २०२५ पर्यंत नागपुरात राहणार आहेत. त्यानंतर ती कोल्हापूर येथील संग्रहालयात हलवण्यात येणार आहेत. नागपूरच्या मध्यवर्ती संग्रहालयात वाघनखांसोबत इतर शिवकालीन शस्त्रांचेही प्रदर्शन सुरू आहे. अनेक शिवप्रेमी दररोज भेट देवून पाहणी करीत आहेत.

# कर्णकर्कश डीजे न्यायालयात

## आवाजावर लगाम घालण्यासाठी याचिका

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

विवाह समारंभात कर्णकर्कश डीजेचा सर्रास वापर होत असून यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. ध्वनी प्रदूषणाबाबतच्या नियमांना डावलून शहरातील सभागृहात, लॉनमध्ये रात्री उशिरापर्यंत डीजे, बँड, फटाके यांचा वापर केला जातो. याप्रकारावर बंदी घालण्यात यावी या मागणीसाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात आली.

**आदेशाची अवहेलना**

त्रिमूर्तीनगर रेसिडेन्स ॲक्शन विंग फाऊंडेशनच्यावतीने ही जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिकेनुसार, ध्वनी प्रदूषण प्रतिबंधक कायदा-२००० नुसार, एका मर्यादेच्यावर ध्वनिक्षेपकाच्या वापरावर बंदी आहे.

उच्च न्यायालयानेही अनेक प्रकरणात याबाबत आदेश दिले आहेत. मात्र, शहरात सर्रास या नियमांचे उल्लंघन होत आहे. त्रिमूर्तीनगरातील याचिकाकर्त्यांनी याबाबत स्थानिक राणाप्रताप पोलीस ठाण्यात व नंतर पोलीस आयुक्तांकडे तक्रार केली होती. महापालिकेकडे देखील निवेदन सादर केले. मात्र त्यांच्या तक्रारीवर कुठलीही कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे नागरिकांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करत दाद मागितली.



**डीजे वर आणा बंदी**

ध्वनी प्रदूषण प्रतिबंधक कायद्याची कठोर अंमलबजावणी करा, सक्षम प्राधिकरणाच्या लिखित परवानगीशिवाय डीजे तसेच इतर ध्वनिक्षेपकांच्या वापरावर बंदी आणा, डीजेची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर प्रादेशिक परिवहन विभागाने कारवाई करावी, शहरात शांतता क्षेत्रांची निश्चिती करावी, वारंवार नियमांचे उल्लंघन करणाऱ्या डीजे संचालकांचा परवाना रद्द करा, ध्वनी प्रदूषण प्रतिबंधाच्या नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी विशेष दलाची स्थापना करावी, आदी मागण्या याचिकेतून करण्यात आल्या आहेत.

याचिकेत राज्याचे गृहविभाग, नगरविकास विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूरचे पोलीस आयुक्त, महापालिका आयुक्त यांना प्रतिवादी करण्यात आले आहे. न्यायालयाने सर्व प्रतिवादींना नोटीस बजावत दोन आठवड्यात जबाब नोंदविण्याचे आदेश दिले. याचिकाकर्त्यांच्यावतीने ॲड. तुषार मांडलेकर यांनी बाजू मांडली.

# आम्ही मुस्लिम विरोधी नाही

## बावनकुळे यांचा खुलासा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :



आम्ही मुस्लिम विरोधी नाही तर भारतात राहून पाकिस्तानचा झेंडा घेऊन फिरणा-यांच्या विरोधात आहोत. पाकिस्तान मॅच जिंकल्यानंतर भारतात राहून फटाके फोडणारे जे लोक आहेत, त्यांच्या विरोधात आम्ही आहोत, असे बावनकुळे म्हणाले.

ते नागपूर मध्ये पत्रकारांशी बोलत होते. राज्यात हिंदू मुस्लिम यांच्यामध्ये भाऊ बंदकी आहे, या देशाचा रक्ताचा अंश आहे. की सर्वांना सोबत घेऊन आम्ही जातो, असे बावनकुळे म्हणाले

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ३० मार्चला नागपूर दौरा आहे.. संघ मुख्यालय, दीक्षाभूमी, त्यानंतर माधव नेत्रालय आणि दारुगोळा निर्माण सोलार कंपनीला ते भेट देणार आहेत. भाजपकडून प्रत्येक चौकात मोदीजींचे स्वागत केले जाणार आहे..

नागपूरमध्ये उसळलेली दंगल आणि मुस्लिम समाजाच्या कार्यकर्त्यांवर केलेल्या कारवाईमुळे भाजपच्या विरोधात अल्पसंख्यक समाजामध्ये मोठा रोष निर्माण झाला आहे. आम्हाला टार्गेट केले जात आहे, असा त्यांचा आरोप आहे. दंगलीला प्रोत्साहित करणाऱ्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले नाहीत असाही रोष आहे. या सर्व घटनाक्रमावर भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री बावनकुळे यांनी मत व्यक्त केले.

# वाहनात सापडला देशी कट्टा, काडतुसेही जप्त

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २७ :

तुमसर तालुक्यातील खापा चौकात उभ्या असलेल्या टवेरा गाडीत पोलिसांना एक देशी कट्टा आणि दोन बुलेट सापडल्या. या कारवाईमध्ये पोलिसांनी एकाला अटक केली असून अन्य एक आरोपी फरार आहे.

देशी कट्टा आणि दोन राऊंडसह दोन तरुण खापा चौकात आलेले असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे तुमसर पोलिसांनी कारवाई केली. त्याआधारे पोलिसांनी गाडीची तपासणी केली असता कट्टा आणि दोन बुलेट गोळ्या सापडल्या.

एका टवेरा गाडीत दोन युवक रामटेकहून येत होते. तुमसर तालुक्यातील खापा चौकात गाडी थांबवून ते दोघे एका हॉटेलमध्ये जेवणासाठी गेले होते. पोलीस करवाई नंतर या गाडीतील दोघांपैकी एक आरोपी फरार झाला असून सुमित संजय सोनवाने रा. रामटेक याला अटक करण्यात आली . प्रकरणाचा संबंध आयपीएल जुगाराशी असून परिसरात कुठेतरी सट्टाबाजार सुरू आहे याबद्दल चर्चा रंगू लागल्या आहेत. मात्र याचा आयपीएल जुगाराशी खरोखरच काही संबंध आहे का? यादृष्टीने पोलीस तपास करीत आहेत.























